संपादक: नारायण सुर्वे

# दलित काव्यदर्शन

MR
891.461 8
Su 79 D

MR
891.4618
Su 79D

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# दलित काव्यदर्शन

संपादक
**नारायण सुर्वे**

लोकवाङ्मय गृह

Entered

Library IIAS, Shimla
MR 891.461 8 Su 79 D
00124277

**दलित काव्यदर्शन** / संपादक : नारायण
Dalit Kavyadarshan / Narayan Surve

म / ६३९
पहिली आवृत्ती : ३० ऑगस्ट १९९२ 30 Aug. 1992
दुसरी आवृत्ती (I) : फेब्रुवारी २००० Feb 2000

124277
31-3-08

मुखपृष्ठ : कमल शेडगे

MR
891.4618
Su79 D

मूल्य : ४० रुपये
Rs 40.00

ISBN 81-86995-82-X

मुद्रक/प्रकाशक :
प्रकाश विश्वासराव Prakash
लोकवाङ्मय गृह Vishwasrao
भूपेश गुप्ता भवन Lokvangmaya
८५, सयानी रोड
मुंबई - ४०० ०२५ Mumbai

मुद्रण स्थळ :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत

*महात्मा जोतीराव फुले*
आणि
*भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर*

ह्यांना आदरपूर्वक

# काव्यदर्शनापूर्वी . . .

मराठी साहित्याचा इतिहास फार जुना आहे व त्याच्या केंद्रस्थानी कविता प्रमुख आहे. वाङ्मयाच्या प्रमुखस्थानीही 'काव्य' हाच कलाप्रकार प्रथम मानाचे पान म्हणून अवतरलेला आहे. संवेदनांचा प्रथम आविष्कार म्हणजे काव्य किंवा काव्याच्या रूपानेच व्यक्त होतो असेही म्हटले जाते. मराठीत कालखंडाच्या क्रमाने पाहिल्यास १. संतवाङ्मय, २. पंडिती काव्य, ३. शाहिरी वाङ्मय, ४. आधुनिक मराठी कविता असे ठळक टप्पे मानले जातात.

आधुनिक मराठी साहित्याचे वय, ज्यात कविता ही शीर्षस्थानी आहे, सव्वाशे वर्षांचे आहे. सर्वसाधारणपणे लेखनाच्या क्षेत्रात सुशिक्षित वर्ग किंवा पांढरपेशा वर्गच प्रमुख होता व ते स्वाभाविकही होते. शिकलेला वर्ग तोच होता. लिहिणारा-वाचणारा किंवा ज्ञानसाधना करणाराही तोच होता, त्यामुळे त्याची सुखदु:खे ही एकूण मराठी लोकांची सुखदु:खे असे मानले जाऊ लागले. परंतु ते खरे नव्हते. स्वातंत्र्यानंतर सर्व थरांत शिक्षण पोचल्यावर त्या त्या समाजघटकातून नवी शिक्षित पिढी पुढे आली आणि त्यांच्या लेखनाने मध्यमवर्गीय किंवा पांढरपेशी लेखनाचे मर्यादित स्वरूप उघड केले. शिक्षण पसरू लागले आणि साहित्याच्या कक्षाही रुंद होत चालल्या.

स्वतंत्र भारतात खेड्यापाड्यात शिक्षण पोचल्याने समाजातील सर्व थरांतील तरुण पिढी शिकू-वाचू लागली. ती लिहूही लागली. मराठी साहित्यात एक नवे चैतन्य उफाळून आले. स्वाभाविकपणेच आमचा दलित बांधव जो गावकुसाबाहेरचे असह्य व अमानुष जिणे जगत होता तोही बोलका होऊ लागला. त्याची अस्मिता जागी झाली. एकूण मराठी साहित्यात आपल्या जीवनाचे 'दर्शन' कोठे आहे, हे तो शोधू लागला. त्याच्यात एक नवे मन्वंतर घडले आणि ते 'दलित साहित्या'च्या रूपाने व्यक्त होऊ लागले. नवे जागरण सुरू झाले. नवा आत्मस्वर मिळाला. ह्या सर्व उठावाच्या केंद्रस्थानी महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महनीय कार्य आणि क्रियाशील विचारवंत म्हणून त्यांची प्रेरणा दीपस्तंभासारखी उभी राहिली.

मराठी कवितेत दलित कवितेच्या रूपाने नवा कालखंड सुरू झाला. इतिहासानेच नवी धडक मारून एकूण मराठी साहित्याला भानावर आणले. ठराविक परिघात अडकलेले मराठी वाङ्मय अधिक विस्तारू लागले. ह्या नव्या वास्तवाने आपले नवे नायक व नवे कलावंत जन्माला घातले. त्याला मोठा वाचकवर्गही लाभला आणि दलित साहित्यप्रवाह महाराष्ट्रात रूढ होऊ लागला.

दलित साहित्य हे केवळ चातुर्वर्ण्यविरोधी किंवा स्वत:च्या सीमित जगापुरतेच पाहणारे साहित्य नाही तर ते समग्र मानवजातीच्या महान मुक्तिलढ्यात सामील होऊन त्या जययात्रेतील स्वत:च्या सिंहाचा वाटा उचलणारे साहित्य आहे. समग्र मानवजातीच्या मुक्तीतच दलित मुक्तीचालढा समाविष्ट आहे, हे लक्षात ठेवून व्यक्त होणारे साहित्य आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणालेच होते, "गुलामाला गुलाम असल्याची जाणीव करून द्या. मग तो बंड करून उठेल." तसेच पुढे ते एका ठिकाणी असेही म्हणाले होते, "मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की, उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये यांचा आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कार करा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका, तिचा विस्तार करा." हे विचार दलित साहित्याच्या केंद्रस्थानी आहेत.

दलित साहित्यातील प्रमुख व प्रभावी अभिव्यक्ती दलित कविताच आहे व तिचीच अधिक चर्चा होत राहिलेली आहे, होत रहाणार आहे. मराठी कवितेला हे एक मौल्यवान लेणेच लाभलेले आहे. ह्या

कवितेचा मूलस्रोत, तिची भाषा व आशय, तिची अंगभूत लय आणि शब्दकळा, एकूण मराठी काव्यातील तिचे स्थान व भवितव्य आदि सर्वच संभवनीयतेचा विचार होतच राहणार आहे.

मराठी कवितेतील प्रकट होत असणारा हा गतिमान प्रवाह सतत खेळता, वाहता रहावा म्हणूनच की काय, 'दलित काव्यदर्शना'च्या रूपाने तो अधिकाधिक लोकांसमोर जावा किंबहुना प्रत्यक्ष दलित कविंना त्यांच्या कविता वाचायला न सांगता अगदी नवाच प्रयोग म्हणून तरुण, उत्साही नाट्यशिबिरार्थीकडून रसिकांसमोर सादर करावा, असा विचार महाराष्ट्रातील विख्यात नाट्य-दिग्दर्शक व नेहरू सेंटरचे प्रमुख प्रा. कमलाकर सोनटक्के यांच्या मनात आला. त्यांनी हा मनोदय बोलून दाखविला. मला देखील ही कल्पना आवडली आणि लगेच कामास लागलो.

युरोपात कवींच्या कविता सादर करणारा एक लहानसा वर्ग अस्तित्वात आहे, असे ऐकून होतो. ही मंडळी मूळ कवींच्यापेक्षाही अधिक उत्तमरितीने त्या त्या कविंच्या कविता सादर करतात. रसिक उभ्याउभ्यानेच त्या कविता ऐकतात व दाद देऊन पुढे होतात, असे मला पु. ल. देशपांडे ह्यांनीही एका बैठकीत सांगितल्याचे आठवते. मी स्वतः महाराष्ट्रात काव्यवाचनाचे कार्यक्रम सादर करीत असतो. परंतु त्या स्वतःच्या कविता असतात. इतरांच्या नसतात. तरीही हे काम मी अंगावर घेतले आणि आज तो उपक्रम आपणासमोर सादर होत आहे.

आणखी एक : दलित कविता फार मोठ्या संख्येने लिहिली जात आहे. परंतु त्या सर्वांचा समावेश ह्या छोट्याशा संग्रहात करणे शक्य नव्हते. काही निवडक कवीच निवडले आहेत. मुख्यतः विविधांगी पसरलेले दलित जीवनाचे दर्शन घडावे, त्यांच्या लकबी, अंगभूत लयी, वैविध्यता, प्रेरणा आणि मूलस्रोत ध्यानी यावेत, हा हेतू आहे. तरीही ह्या संग्रहात समाविष्ट होऊ न शकलेल्या कवींनी माझी असमर्थता ध्यानी घ्यावी, ही विनंती.

कवितांच्या निवडीपासून तो प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या सादरीकरणापर्यंत, तसेच हा काव्यसंग्रह तयार करण्याबाबत मला पूर्ण मोकळीक दिली त्या नेहरू सेंटरचे प्रमुख व माझे मित्र प्रा. कमलाकर सोनटक्के यांचे आभार मानतो. लोकवाङ्मयगृहाचेही आभार मानतो. ह्या सादरीकरणाच्या कार्यक्रमास सहभागी झालेल्या सर्व तरुण नाट्यशिबिरार्थींनाही धन्यवाद. त्यांनी ही जोखीम अंगावर घेतली म्हणूनच हे शक्य झाले.

म. जोतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिशताब्दी वर्षाच्या ह्या ऐतिहासिक सोहळ्यात ह्या नव्या उपक्रमाचे अखिल महाराष्ट्रातील रसिक व कवितेचे चोखंदळ चाहते स्वागत करतील, असा मला भरवसा वाटतो.

केशवसुत म्हणालेच होते, **"बाबा, जग हे बदलायाचे."**. त्या दिशेने हे सर्व यात्रेकरू निघालेत. सर्वांच्या सदिच्छा पाठीशी घेऊनच.

**नारायण सुर्वे**
३० ऑगस्ट, १९९२

---

**टीप:** ह्या सादरीकरणाच्या निवडीसाठी दलित कविंचे काव्यसंग्रह आणि प्रा. केशव मेश्राम संपादित 'विद्रोही कविता' ह्या संकलनाचा मोठाच हातभार लागला. सर्वांचे आभार मानतो.

इशें केलें नाहीं तुजसाठीं सर्व ॥ करूं नको गर्व ॥ प्राण्यांमध्यें ॥१ ॥
देह देऊनियां बुद्धिमान केला ॥ धनीपणा दिला ॥ सर्वांमध्यें ॥२ ॥
जगाच्या कल्याणा देह कष्टवावा ॥ कारणीं लावावा ॥ सत्यासाठीं ॥३ ॥
अशा वर्तनानें जन्माचें सार्थक ॥ संतोषी निर्मीक ॥ जोती म्हणे ॥४ ॥

**— जोतीबा फुले**
(महात्मा जोतीबा फुले : समग्रवाङ्मय)

"मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की, उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये यांचा आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कार करा. **आपले लक्ष आकुंचित, मर्यादित ठेऊ नका. ते विशाल बनवा.** आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरतीच बंदिस्त करू नका. **तिचे तेज खेड्यापाड्यातील अंधार दूर होईल असे प्रवर्तित करा.** आपल्या या देशात उपेक्षितांचे, दलितांचे फार मोठे जग आहे, हे विसरू नका. त्यांचे दु:ख, त्यांची व्यथा नीट समजून घ्या, आणि आपल्या साहित्याद्वारे **त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा, त्यातच खरी मानवता आहे."**

**— डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १. | कुसुमाग्रज | अनावरण / १ |
| २. | अण्णा भाऊ साठे | जग बदल घालुनी घाव / ३ |
| ३. | नारायण सुर्वे | सत्य / ४ |
| | | तुमचंच नाव लिवा |
| ४. | दया पवार | हे महाकवे / ६ |
| | | कोंडा |
| ५. | केशव मेश्राम | आमच्या वस्तीत / ९ |
| | | एक दिवस मी |
| ६. | यशवंत मनोहर | वैरी / १२ |
| | | कालचा पाऊस |
| ७. | नामदेव ढसाळ | डॉ. आंबेडकर १९८० / १३ |
| | | अंधाराने सूर्य पाहिला |
| ८. | हिरा बनसोडे | सखी / १७ |
| ९. | वामन निंबाळकर | माय / १९ |
| १०. | अर्जुन डांगळे | बलुतेदार / २० |
| | | युगाच्या इतिहासासाठी |
| ११. | प्रल्हाद चेंदवणकर | ऑडीट / २२ |
| १२. | माधव कोंडविलकर | वाढत होतो / २३ |
| १३. | ज्योती लांजेवार | कशाला जन्माला आलास ? / २५ |
| | | काळाजी गरज |
| १४. | ज.वि. पवार | तुरुंगातली पाखरे / २७ |
| १५. | मल्लिका अमरशेख | संभावित सुर्यासारखे / २८ |
| १६. | प्रकाश जाधव | माणूस नामका धरम / ३० |
| | | मरण |
| १७. | त्र्यंबक सपकाळे | तर मी काय करू ? / ३२ |
| १८. | बा.स. हाटे | फाटलेली जींदगी / ३४ |
| १९. | भगवान भोईर | उन्हातलं झाड / ३५ |
| २०. | भुजंग मेश्राम | बजारहाट / ३७ |
| | | जांगड |

# अनुक्रम


[illegible]

# कुसुमाग्रज

## अनावरण

मी तुमच्या पुतळ्याचं
बाबासाहेब
आज अनावरण केलं
(तुम्हाला कळलंच असेल.)
तुमच्या पुतळ्याला
डोळे मिटून भाविकतेनं
नमस्कार केला
( 'नाटक केलंस बामणा ?' )
नाटक ?
थोडंफार असेलही
लोकांच्या नजराच नाटकाला जन्म देतात
ते पृथ्वीवर वावरणाऱ्या
कोणालाच चुकत नाही
(ऐकलंय - 'जग ही रंगभूमी' वगैरे)
कबूल आहे, पण
सारंच नाटक नव्हतं
निमिषार्ध—
अगदी निमिषार्ध बाबासाहेब
माझ्या दृष्टीतून अवतरला
एक श्रध्दाशील श्रमण
बोधी वृक्षाच्या तळाशी बसलेल्या
तथागताकडे पाहणारा
( 'कविता करतोस काय यमक्या ?' )
नाही बाबासाहेब
'तुम्ही' हा विषय
कवितेत मावणारा नाही
हे पूर्वीच लक्षात आलंय माझ्या
रंगीत फुग्यामध्ये
आकाश पकडण्यासारखे
आणि तरीही
सहस्त्र कविता लिहिल्याचं

अपूर्व समाधान
त्याक्षणी मला मिळालं
('लोकांच्या टाळ्या घेतल्याचं ?')
तेही असतंच
कोणत्याही व्यासपीठावर
टाळ्यांची तोरणं बांधावी लागतातच
पण मला मिळालं
'ते' समाधान नव्हतं
तो एक अद्भूत 'अनुभव' होता
त्या क्षणार्धात मी
माझ्या संगमरवरी चौथऱ्यावरून
खाली-खोल-खोल, कोसळत गेलो
कड्यावरून दरीत
भिरकावलेल्या दगडासारखा
थेट पाताळापर्यंत, जेथे
'खाली' ही संज्ञाच
शिल्लक राहिली नव्हती
त्या तळावरून
मी तुमच्या पुतळ्याकडे पाहिलं
तेव्हा पुतळा दिसलाच नाही
दिसत होता, जाणवत होता
एक विराट दाहक तेजोगोल
सूर्याच्या कोरोनासारखा.

□□□

# अण्णा भाऊ साठे

## जग बदल घालुनी घाव !

जग बदल घालुनी घाव । सांगून गेले मला भीमराव ॥

गुलामगिरीच्या या चिखलात । रूतून बसला का ऐरावत ।
अंग झाडुनी निघ बाहेरी । घे बिनीवरती धाव ॥

धनवंतांनी अखंड पिळलें । धर्मांधांनी तसेच छळले ।
मगराने जणू माणिक गिळीले । चोर जाहले साव ॥

ठरवुन आम्हा हीन कलंकित । जन्मोजन्मी करूनी अंकित ।
जिणे लादुनी वर अवमानित । निर्मून हा भेदभाव ॥

एकजुटीच्या या रथावरती । आरूढ होऊन चल बा पुढती ।
नव महाराष्ट्रा निर्मून जगती । करी प्रकट निज नांव ॥

□ □ □

# नारायण सुर्वे

## सत्य

तुझे गरम ओठः ओठावर टेकलेस तेव्हा,
तेव्हाही रात्र अशीच होती; घुमी
पलीकडे खडखडणारे कारखाने
खोल्याखोल्यांतुन अंथरले बिछाने
मुल्लाचा अल्लासाठी अखेरचा गजर
काटे ओलांडित चालले प्रहर
भावंडांसह कोनाडा जवळ केला आईने
धुमसत, बिछान्यासह फुटपाथ गाठली बापाने.

तुझे गरम ओठः खडीसाखर होत गेले तेव्हा
तेव्हाही रात्र अशीच होती. ओढाळ
खपत होतो घरासाठीच—
विसावत होतो शीण तुझ्या काठावर
तुझ्या खांद्यावर-
तटतटलीस उरीपोटी
तनु मोहरली गोमटी
एक कौतुक धडपडत आले; घर भरले
हादरली चाळ टाळांनी, खेळेवाल्यांनी
वाकलीस खणानारळांनी

तुझे गरम ओठः अधिकच पेटत गेले तेव्हा
तेव्हाही अशीच एक रात्र आली, नकार घेऊन
पंखाखाली बसलीस चार पिले ठेवून
कोनाडा हळहळला - कळवळला
'नारायणा' - गदगदला
'शिंक्यावरची भाकर घे' - पुटपुटला
'उद्यापासून तिलाही काम बघ बाबा'
गांगरलो. भोवंडून स्थीर झालो
तिच्या ओठावर ओठ टेकवून
बिछान्यासह बाहेर पडलो, त्या रात्री,
तिचे ओठ अधिकच रसाळ वाटले, अधिकच— ☐☐☐

## तुमचंच नांव लिवा

मास्तर, लिवा-
तुमचंच नांव लिवा.
खरं सांगते; मरीआईला समरून सांगते,
लिवा तुमी-
ह्येच्या केसाची जटा बगा मास्तर;
कसा नागाचा फडा हाय त्यो_
अवं_ देवाचं देणं हाय त्ये_ देवाचं.
मास्तर, जिमीन उतमातती_
व्हय, उफानती, पर
नांगुर घातल्याबिना, आन
बी पेरल्याबिना,
रोप वर उगतं का ? उगतं ? बोला
मग बापाच्या जागी माजं नांव लिवून कसं जमंल
बाप न्हाई म्हनलं तर पोराचा म्होरला जलम कसा जळंल

कनच्याबी देवाचं नांव नगा लिवू
मानसाचंच लिवा_
देवानं काय केलंय हो,
वटी तेनंच ना भरली ही_
तुमचंच नांव लिवा.

जात नगा इच्चारू;
अवं, आमी कुना एकाची का बायली हावंत मास्तर,
घरोट्यातल्या बाया नव्हत आमी,
तेवढं कुठलं हो नशीबाला_

तेचा जलम हितलाच.
फाटंला जलामला त्यो; फाटंला
पॉट निरनाखाली सराकलं
ना सुईण, ना काय जवळ
आधी मन चराकलं_पन मग हराकलं

पड, पोरा
पड पाया
पड ह्येंच्या पाया
पर तेवढं तुमचंच नांव लिवा. □□□

## दया पवार

# हे महाकवे

बा वाल्मिकी
रामराज्याची तू स्तूती गावी
कारण तू कवींचा महाकवी ?
क्रौंच पक्षाची हत्या पाहून
तुझे कारूणिक मन आक्रंदून उठले
तुझा जन्म झाला गावाबाहेर
उपेक्षित वस्तीत जिथे दुःखच जन्मले
तिथले विषण्ण चेहरे काळजीने नांगरलेले
फळाफुलांनी नाही कधी बहरले
मुक्तीसाठी त्यांनी टाहो फोडलेले
खरंच का न ऐकले ?
तुझ्याच रक्ताचा एखादा शंबूक
तटतटून संतापाने पेटून उठला
रामराज्याची स्तूती गाणाऱ्या
हे महाकवे...
तिथेही अमानुषतेचा हिमकडा कोसळला

हे महाकवे
तुला महाकवी तरी कसे म्हणावे ?
हा अन्याय अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी तू श्लोक रचला असतास...
...तर तुझे नांव काळजावर कोरून ठेवले असते.

□□□

# कोंडा

कोंडा
तसे तुझे जुने खोड,डपल्या-डपल्याचे
वय उतरणीचे,कधीतरी कोसळणारे
ते आज अचानक मुळासकट कोसळले

डोक्याला कफन बांधून
तू काळाराम सत्याग्रहात लढलेला
एखाद्या तीरासारखा मैदानात उ़तरलेला.

तुझ्या रूपाने वस्तीला इतिहास आठवला
बुध्दम् सरणम् गच्छामि या गजरात
तुझ्या निर्वाणाचा रथ सजला.
-तसा वस्तीचा हा गुण चांगला
तोरणादारी का मरणादारी
हे असे उत्साहाने ओघळतील.
बाकी जिंदगीभर,
एकमेकांवर काठ्या घालतील.

आजही तसेच झाले
झाडून साऱ्यांनी खाडा केला
जो तो दु:खाने गहिवरलेला
गटागटाने अंतयात्रेत मिसळलेला.

मी सहजच तुझ्याकडे पाहिले,
वर्गणी जमवून आणलेली
फुलाफुलांची नक्षीदार चादर पांघरलेली
उन्हाची तिरीप झेलीत कुणीतरी
तुझ्यावर छत्री धरलेली

का कुणास ठाऊक
करड्या मिशीतून तू हासलास
नेहमीसारखा टाळी द्यायचास
पण रस्सीने चांगलाच जखडलास.

अंतयात्रा हमरस्त्यावर येता
वरल्या आळीने उघडल्या खिडक्या दारे
'अहो,पाहिलंत का

रेशनच्या गोण्या वाहणारा
बिचारा कोंडा मेला'

'मम्मी, तोच ना ग हा
पाणी वरून वाढायची याला
ओंजळीने कसा घटाघटा प्यायचा'

'चल, आत हो-तोंड पाहू नये'
पटापट बंद झाली खिडक्या दारे

जथा जसा स्मशानाकडे सरकला
पुन्हा बुध्दम् सरणम् चा गजर घुमला.

आता स्मशानात भाषणाची चढाओढ लागलेली
'कोंडा आमच्या जिल्ह्यातला' जिभेला रसवंती फुटलेली

भाषणाच्या चक्री वादळात तू चांगलाच भोवंडलेला
म्हणतोस 'पोरा-जरा जाऊन शेकतो, आयुष्यभर गारठलेला'
असे म्हणून तरातरा पेटत्या सरणाकडे चालू लागलेला

भाषणांची तबकडी चालूच 'कोंडा किती किती महान
काळाराम सत्याग्रहात लढलेला'

□□□

# केशव मेश्राम

## आमच्या वस्तीत

आमच्या वस्तीत भांबावतो पोष्टमन,
गोंधळतात संस्कार, अडखळते सभ्यता
अंधारतो सूर्यही, चिखलात उठावेत
गुरांच्या खुरांचे ठसे, तशी ठसठसती
आमची घरे — त्यातच असते प्रवाहोत्सुक मन

आमची वस्ती गाजता, गरजता फेसाळता
बेफाम समुद्र काळ्या लाटांलाटांचा,
साच्यात काचणारी, मातीत मुरणारी
इथली माणसे, मुलायम कापसाची कावड वेचणारे
अशक्त राठ हात, विळ्यासोबत नाचणाऱ्या बांगड्या,
पोरे इथली घामाझोकळ रणरणत्या उन्हात,
उघड्या ट्रकमध्ये, फुगऱ्या नसांची, मिटल्या डोळ्यांची
वस्ती आमची दारूच्या घोटात, तिखट नळ्यांच्या
ताटात रंगणारी, महिनाभर राबूनही अर्धपोट जगणारी
मेणबत्तीच्या संबुध्द प्रकाशात भविष्ये न्याहाळणारी. नवनव्या दिसांची
लागताच पोष्टमनची चाहूल खळखळते वस्ती आमची.

गिचमीडीतून उठलेली पेन्सिलीची जांभळी अक्षरे
कुणाच्या जिभेवरली ओलसर मेंदी झिरपली असेल !
'राजू नरायेण' शोधशोधून पोस्टमन हैराणः
नंग्या मार्गदर्शकांची भिरभिर गर्दी,
नडगी शेकलेल्या विव्हळणाऱ्या मुक्यासारखा
भटकतोय पोस्टमन, वाकून दलदल चिखलातून,
भोंगळ कपड्यात घाम निथळतो, पायपीट सरते,
'खेडेवाल्या बुडगीचं सोनं, झाल्याची घार
झेपावत, नखे रोखून वस्ती पंखाखाली घेते.

भांबावतात सुधारणा आमच्या वस्तीत,
ठेचाळतात रस्ते, योजनाही अडखळतात,
आता आत्ताशा थोडे वाचतात 'मुलगे' लिहितात
कथाकविताः शब्दांच्या कुऱ्हाडी कोसळतात

जूनजुनाट झाडांवर, साहित्याच्या स्वप्नावर बरसतात
अनोख्या वास्तवाच्या गरम अनुभवी गारा,
पुन्हा होतात सुरू, पोलिस पोस्टमेनच्या येरझारा
काळोख खदखदतोय उभा सूर्य पचवून,
आमच्या वस्तीत भांबावतो पोस्टमन अजून

□□□

# एक दिवस मी परमेश्वराला

एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली:
तो लेकाचा फक्त फक्कन हसला,
शेजारचा जन्मजात बोरूबहाद्दर उगीचच हिरमुसला,
एरंडेली चेहरा करून मला म्हणाला :
"तू असा रे कसा, त्या निर्गुण निराकार
अनाथ जगन्नाथाला काहीतरीच बोलतोस ?
शब्दांच्या फासात त्याचा धर्मफणा धरतोस ?"

पुन्हा एकदा मी कचकून शिवी दिली,
विद्यापीठाची इमारत कमरेपर्यंत खचली,
माणसाला राग का येतो या विषयावर
आता तेथे संशोधन सुरू आहे,
उदबत्तीच्या घमघमाटात भरल्या पोटाने
भावविव्हळ चर्चा झाली,
माझ्या वाढदिवशी मी परमेश्वराला शिवी दिली.

शिवी दिली, शिव्या दिल्या, लाटांसारखे
शब्दांचे फटकारे मारीत मी म्हटले,
'साल्या ! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय ?
चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजलेले हाडके शरीर पुसशील काय ?
बापाच्या विडीकाडीसाठी
भावाबहिणींची हाडके झिजवशील ?
त्याच्या दारूच्या घोटासाठी भडवेगिरी करशील ?

बाप्पा रे, देवबाप्पा रे ! तुला हे जमणारच नाही,
त्यासाठी पाहिजे अपमानित
मातीत राबणारी,
प्रेम करणारी मायमाऊली –'
एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली.

□□□

# यशवंत मनोहर

## वैरी

ते ग्रीष्म माझे वैरी आहेत
ज्यांनी इथे प्रमाणिकपणा रूजू दिला नाही
ते आहेत आपमतलबी बगलबच्चे
ज्यांनी सत्याचा जन्म उजेडात येऊ दिला नाही
सैतान असली ते आहेत
ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकूस घडवले
कपटी चांडाळ ते आहेत
ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडवले
ज्या नियमांनी सृष्टीचा हा विद्रूप विकास सिध्द झाला
त्यांचा मी जळजळीत निषेध करतो
ज्यांनी इथल्या सूर्याला दगडांनाही
ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले
संचित निश्चित केले
त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो
ते सर्व देव दैववादी माझे वैरी आहेत
ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली तिची मधुर ओवी केली
ते शब्दप्रामाण्यवादी सगुण निर्गुण वैरी आहेत माझे
ज्यांनी मला आजवर मुक्त होऊ दिले नाही.

□□□

## कालचा पाऊस

कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे
कालपर्यंत पावलांनी रस्त्यांपाशी तक्रारी मांडल्या नाहीत
झाडे करपली. माथी हरपली.
नदीच्या काठाने मरण शोधित फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो
कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही.

□□□

# नामदेव ढसाळ

## आंबेडकर : १९८०

तू मेलास, म्हंजे संपला नाहीस.
आमच्या सारखाच तुही झोपलास बायकोबरोबर
पोरं काढलीस. पण वाऱ्यावर सोडली नाहीस
आम्ही वाढलो असे, तसे, कसेही
परंतु आमच्या मुलांना
तुझी माया डावलण्याची हिंमतच होणार नाही कधी
अॅकॅडॅमिशयन । टेक्नीशियन । पॉलिटिशन । सायंटिस्ट
फिलॉसॉफर
हे काहीही लावतील तुझा अन्वयार्थ
तू जगलास फक्त माणसासारखं
ना त्याच्यात नाटक होतं
ना नाट्याविष्कार
ना नक्कल, ना नकलाकार

आता हे सर्व जुनं झालंय,
की त्यांनी आम्हाला वरून पाणी वाढलं
आता हे सर्व जुनं झालंय
की त्यांनी शाळेच्या पडवीबाहेर आम्हांला बसवलं
आता हे जुनं झालंय
की त्यांनी विठोबाचे काळेपांढरे पाय
आम्हाल पाहू दिले नाहीत
आता ते आणि आम्ही सगळेच सारखेवारखे
या जगातला समाजवाद
या जगातला कम्युनिझम
आणि तुझंही सर्वकाही
आम्ही लावलं आहे कसाला
त्यातनं झालं हे ध्वनित
आपलीच सावली आपल्या पायांना झाकू शकते

२

तुलाही शिव्या देतो परंतु
जीभ तूच दिलीस
तुलाही पाण्यात बुडवतो,परंतु
पाणी तुच दिलेस
तुझे काहीही केले,तरीही
तुझे काहीही करता येते
परंतु प्रश्न राहतो माझ्या इमानाचा
प्रामाणिकपणाचा
तू कोण आहेस ?
तू कोण होतास ?
तू कुणाचा आहेस ?

३

जमाना सर्व तुझाच आहे
तरीही तुझे लोक दु:खी आहेत
फकिराला पंतप्रधान होता येतं इथं
परंचु मांगा - भंग्याला नाही.
खुर्चीपुढे संसदेची किंमत झाली आहे कमी
कायद्यापुढे रंडिची किंमत झाली आहे कमी
या सर्वामध्ये एकच पाहिले
की तुझे ऋतुचक्र सर्वांवर बरसले सारखे
कुठेही झाला नाही तुझ्याकडून पंक्तीप्रपंच

४

शुक्रवारचा दिवस होता
उजळणीचं पुस्तक एक स्लेट
आणि दगडी पेन्सिल
आईनं हौसेनं आणली बाजारातून

त्या दिवशी ती फारच थकली होती
चिमणीच्या उजेडात
तिने चेपून घेतले हातपाय माझ्याकडून.
नंतर ती म्हणाली,

'बाबा– मला डुलकी लागेपर्यंत
पाहून घे हे बुक
मी नाही शिकली सवरलेली
पण एक कर
शिक्शनाची सुरुवात
बा म्हणजे बाबासाहेबापास्नं कर
गणपतीपेक्षा ते लईच सुंदर होते.
म्हणून नको गिरवूस
श्रीगणेशा
गणांचा पती नस्तो कुरूप
तो असतो माणसातला
सत्यम । शिवम् । सुंदरम्
सत्यम शिवम् सुंदराला
म्हणतात बाबसाहेब आंबेडकर
बाकी या बुकाला काय बी आरथ नाही बघ

५

हे सर्व लिहीपर्यंत रात्रीचे
तीन वाजलेयत
दारू पिण्याची इच्छा असूनदेखील
दारू पिऊशी वाटत नाहीय.
फक्त झोपावेसे वाटते शांत
उद्याची वर्णहीन सकाळ पाहाण्यासाठी

□□□

# अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा

अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा
शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाड्यात
किती दिवस रहायचं आम्ही ?
श्वास घुसमटत !
_न_नष्टचर्येच्या गटारात
सडत होतो आम्ही अगतिक किड्यासारखे
आजपर्यंत_
लक्तरांत गुंडाळलेली आमुची अब्रू
गोलपिठ्यावर नागविणारांनो-
-तुमचा ऱ्हास जवळ आलायः
मुक्तछंदाच्या संजिवनीने
आम्ही जिवंत झालो आहोत-
-तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी !
-शब्द म्हणाले
अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा

□□□

## हिरा बनसोडे

# सखी

सखी,
आज प्रथमच तू माझ्याकडे जेवायला आलीस,
नुसतीच आली नाहीस तर तुझी जात विसरून आलीस.
सहसा बायका परंपरेची विषमता विसरत नाहीत
परंतु तू आभाळाचे मन घेऊन आलीस.
माझ्या वीतभर झोपडीत,
वाटलं, जातीयतेचा तू कंठच छेदला आहेस,
माणसाला दुभंगणाऱ्या दऱ्या तू जोडीत आली आहेस.

खरंच सखे, फार फार आनंदले मी,
शबरीच्या भोळ्या भक्तीनेच मी तुझं ताट सजविलं
किती धन्य वाटलं मला !
पण_पण ताट बघताच तुझा चेहरा वेडावाकडा झाला,
कुत्सित हसून तू म्हणालीस,
"इश्य ! चटण्या, कोशिंबिरी अशा वाढतात का ?
अजून पान वाढायलाही तुला येत नाही !"
खरंच, तुमची जात कधीच सुधारणार नाही !"

माझा जीव शरमून गेला_
मघाशी आभाळाला टेकलेले माझे हात
चटकन कुणीतरी छाटल्यासारखे वाटले,
मी गप्प झाले.

जेवण संपता संपता तू मला पुन्हा विचारलेस,
"हे ग काय ? मागच्या भातावर दही, ताक काहीच कसं नाही ?
बाई ग, त्याशिवाय आमचं नाही हो चालत_?"
माझं उरलंसुरलं अवसानही गळालं
तुटलेल्या उल्केसारखं,
मन खिन्न झालं, सुन्न झालं पण_
पण दुसऱ्याच क्षणी मन पुन्हा उसळून आलं
पाण्यात दगड मारल्यावर जसा तळाचा गाळ वर येतो,
तसं सारं पूर्वायुष्य हिंदकळून समोर आलं,

सखे,दही-ताकाचं विचारतेस मला !
-कसं ग सांगू तुला ?
अग,लहानपणी आम्हाला चहालासुध्दा दूध मिळत नव्हतं,
तिथं कुठलं दही आणि कुठलं ताक ?
लाकडांच्या वखारीतून आणलेल्या टोपलीभर भुश्यावर-
माझी आई डोळ्यांतला धूर सारीत स्वैंपाक करायची
मक्याच्या भाकरीवर लसणाची चटणी असायची कधीमधी,
नाहीतर भाकरी कालवणाच्या पाण्यात चुरून खायचो आम्ही,
सखी,श्रीखंड हा शब्द आमच्या डिक्शनरीत नव्हता तेव्हा,
लोणकढी तुपाचा सुगंध घेतला नव्हता माझ्या नाकाने,
हलवा,बासुंदी चाखली नव्हती कधी या जिभेने,
सखी,तुझी परंपरा तू सोडली नाहीस
तर तिची घट्ट मुळे तुझ्या मनात रुजलेलीच आहेत
हेच त्रिवार सत्य आहे.

मैत्रिणी,मागच्या भातावर दही नाही
म्हणून रागावू नकोस ग...!
तुला वाढलेल्या ताटात आज पदार्थाचा क्रम चुकला
यात माझा काय दोष हे मला सांगशील का ?
माझा काय दोष हे मला सांगशील का ?

□□□

# वामन निंबाळकर

## माय

जसा दिवस डुबून जाई काळोखाचे राज्य असे
आम्ही बसू दरवाज्यात झोपडीत साधा दिवा नसे

घरोघरी दिवे लागत चुलीलाही जाळ लागे
भाकरी जात बडविल्या कुठे चून कुठे वांगे

नाकात जाई वास त्याचा पोटात असे अंधार सारा
तसे येई भडभडून आसवांच्या डोळ्यात धारा

अंधाराला चिरत तेव्हा एक सावली जड येई
डोई तिच्या भारा असे चालताना तोल जाई

काळी,काळी,कृश देह ती असे माझी माय
वणवण सकाळपासून मोळीसाठी रानात जाय

वाट पहात बसू कधी तिची सारे आम्ही भाऊ
मोळी नसे विकत तेव्हा भुकेलेले झोपी जाऊ

एकदा काय कसे झाले आम्हा काही कळले नाही
माय आली पाय बांधून भळाभळा रक्त वाही

चावला साप मोठा काळा दोन बाया होत्या सांगत
फणा काढून मारला त्याने हळूच गेला निघून रांगत

माय पडली धरणीवर गंडे झाले,मंत्र झाले वैद आला
दिवस निघता,निघता तिच्या देहातून प्राण गेला

हंबरडा फोडला आम्ही तो विरला वाऱ्यावर
माय तरी सोडून गेली चिल्लेपिल्ले वाऱ्यावर

शोधते माझी नजर माय,आता मी उदास होतो
दिसता कृश मोळीवाली मोळी तिची विकत घेतो

□□□

# अर्जुन डांगळे

## बलुतेदार

लाख नाकारीत असाल
नाकारा
तुमच्यापैकी कित्येक मनांच्या कंगोऱ्यात
अजून आहे दडवलेला
इंचभर तरी 'पुरीचा शंकराचार्य'
येतो उफाळून कधी कधी तो वर
द्वेषाच्या अग्नीने
'दिवाळीतला साप' जसा व्यक्त होतो विराट रूपात
लहान मुलाने लावलेल्या पेटत्या काडीने
लाख नाकारीत असाल
नाकारा
आम्हाला त्याचे काहीच नाही
नाही उठत आता पेटून भुकेला आत्मा
कारण तोही खूब समजून चुकलाय्
नागडे मन तुमच्या जवळ नाहीच नाही.

लाख नाकारीत असाल
नाकारा
आम्हाला काहीच बोलायचं नाही
आमच्या व्यथांचा जथा
येत आहे खडक ओलांडून - सपाट मैदानावर
ओठात ओवून नकार
डोळ्यात त्याच्या आहे अंगार
येणार आहे, येतो आहे
आमच्या व्यथांच्या जथा सपाट मैदानावर
अन् देणार आहे, देणार आहे
टक्कर या संस्कृतीच्या जुनाट बुरूजावर
कदाचित नाही पडणार खिंडार
होईल रक्तबंबाळ, राहील फक्त वेदनाच माथी
सज्जन हो, फिकीर नाही आम्हाला त्याची
जगू शकतो घेऊन हा वेदनांचा भार
कारण आम्ही युगानुयुगाचे दुःखाचे बलुतेदार.

□□□

## युगाच्या इतिहासा साठी

नसेल सापडत त्यांना माझ्या गाण्यात
त्यांच्याच भाषेत सांगायचे तर
गोळीबंद अनुभवाचा कलात्मक अविष्कार
नसेलही संबंध माझ्या गाण्याचा त्यांच्या मते
कलाकृतीच्या घाटाशी, त्यांनी ठरविलेल्या आकृतीबंधाशी
नसेलही जोडीत नाते माझे गाणे—हेही त्यांच्याच मते
अमूर्त प्रगल्भ चिंतनशीलतेशी
पर्यायाने——
मला नक्की सांगता येणार नाही कशाशी
त्यांचे असो—तसे त्यांना काहीच देणे घेणे नसते
आपण आपले गाणे गात रहाणार
त्यांचे काय
ते जगत असतात
साहित्याचा इतिहास घडविण्यासाठी
आपण जगतो आहोत
युगाचा इतिहास घडविण्यासाठी.

□□□



124277

## प्रल्हाद चेंदवणकर

### ऑडिट

तुमच्या पावलांखाली
दडपलेले आमचे श्वास
अजूनही घुसमटताहेत
गावाबाहेर उकिरड्यात
'देणे' तरी तुमचे किती
दाखवा आम्हाला हिसाब किताब
इतिहासाचे वारसदार
विचारतो आहोत, द्या जबाब !

महात्मा फुले - आंबेडकरांनी
तुमचे अकाउन्टस ऑडिट केलेत;
ग्रंथाग्रंथांच्या पानांवरचे फ्रॉडस्
सगळे डिटेक्ट केलेत;
जर्नल एन्ट्रीज किती करायच्या
ऑडिट रिपोर्ट सादर केलेत
तुमचे मात्र तेच रडे
जानवं पांघरून पेडगावकडे;

गतजन्मांचे कुजके स्टँप्स्
कधीच आऊटडेटेड झालेत
तुमच्या कपाळावरचे गंध
त्या आधीच बायकॉट झालेत;

अजूनही संधी आहे
चूक भूल विसरून जाऊ
तुमच्या पापांची एक्सेस बॅलन्स
रिटन-ऑफ करून घेऊ;

तुम्ही फक्त एवढंच करा
माणसांसारखे वागत चला
तेही जमलं नाहीच तर
दिवाळखोरी जाहीर करा.

□□□

## माधव कोंडविलकर

---

### वाढत होतो

माझ्या काटल्या आहेत वाटा उदरातच असताना आईच्या
पदराखाली घेताना आपल्या म्हणायची, 'बाबा आपुन
तुकड्यावर पोसलो त्यांच्या
गावकीची सेवा करावी, ते म्हंतील तसं वगावं
उचलून बोला नये कोणास सगल्यास्नी बावापुता करावं,'

माय म्हणायची, 'त्येनीच देलानी ना हा थारा-नायतर
वाजलं आस्तं आप्लं बारा,
आपुन पन तसा करूस हवा जग हाय फक्त हसनारा
दुनिया आसुन करूचिय काय हातपाय हालवलं तरच
कोनपन देतात
रडणाराचं कोन नाय हसल्या गालाचं मुकं घेतात'

माय म्हणायची, 'दिवस आमी मरान काडलं-अरेला
कारे म्हटला नाय-
असाच वागसील वाकान जासील तुज्यावर आमचा
इस्वास हाय
बावा सिल्या तुकड्याचे आपुन धनी
दारात जावचा मागान खावचा करूचाय काय
आप्नास आनी.'

असा आप्ला वाढत होतो-उकिरड्यावर वाढतात
जशी डुकरं.
भयाण अंधारात मायच्या कुशीत शिरत होतो
पांघरूण बोंदर

आणि कधीतरी असंच शाळेच्या पटावर चुकून नांव पडलं
तेव्हा झाला एकच कल्लोळ, साऱ्या जिभा वळवळल्या
म्हणाल्या, 'आमची शाळा बाटवलं'
आणि शाळेने कोपरा उदारतेने बहाल केला
तेव्हा शिळा तुकडा घशाला अडकावा तसा एक काटा
खोल कुठेतरी रूतून बसला.

वह्यापुस्तकांचा पत्ता नव्हता, हातात एक फुटकी पाटी
आणि दगडी पेन्सिलीचा तुकडा
कुणीतरी दिलेला शाळेपुरता एक फाटका सदरा, बाकी
दिवसभर उघडा.
दोस्त नव्हते कोणी, दुरून सारे चालत
'आपाडलास तर मार खाशील !' अशी होती हालत.

दोस्तांनो, चामड्यांना चुना लावल्याने हातांना पडलेले
घट्टे आता साफ बुजले आहेत,
मात्र ह्रदयावरच्या खुणा भोवरी क़ापावी तशा कापल्या
तरी अजून वाढताहेत.

□□□

# ज्योती लांजेवार

## कशाला जन्माला आलास ?

कशाला जन्माला आलास ?
इथं या बकालवस्तीत
इथली सगळी झाडं छाटलेली आहेत !
आणि दिव्याच्या खांबांना
गंज लागला आहे__
सारे रस्ते कसे धूळ माखलेले
जागोजागी उभे झाडांचे बुंधे
हत्तीरोगाच्या पायासारखे
कशाला जन्माला आलास ?

इथे जाहिरातींचे टिनपत्रे किंवा
सिमेंटी स्तंभही तुझ्या निवाऱ्याला नाहीत.
इथे फुलांच्या ताटव्यांचे रान माजले
काटेरी-कुंपणाच्या तटबंदीत
किडी-मुंगळ्याचे खाद्य होत
फुलापानांचा ढीग पडला आहे
कशाला जन्माला आलास ?

इथले सारे मोची अनवाणी
दाढी-मिशांचे जंगल वाढविलेले न्हावी;
दातांच्या सेकंडहॅन्ड कवळ्या विकणारे
सारे दंतविहीन दन्तवैद्य;
इथे कात्र्यांनाही मोठा काटेकोरपणा आहे.
कशाला जन्माला आलास ?

हत्ती-घोडे आता रिटायर्ड झालेत इथे.
माणसांचा नवा भरणा सुरू आहे-
माणुसकीला ओढायसाठी,
सज्ज होऊन माणूसपागेत.
कशाला जन्माला आलास ?

□□□

## काळाची गरज

आई_तुझ्या गर्भात
रक्तरंजित लेकरू

थांब_! पायधूळ लावू दे
मला मस्तकी_

बाबा_तुझ्या ह्रदयात
सनातन्यांचे लेणे

थांब_उतरवू दे_मला
डोळ्यात माझ्या.

ताई_तुझे प्रेम हटव
भिजल्या गालावरून

मी आधीच भार वाहतोय
माझ्या आसवांचा.

दादा_तुझे हात हवेत
या थकलेल्या हातात

अन्यायाविरूध्द बंड
उभारण्यासाठी_

मुला,तू अजून निद्रिस्तच
ऊठ_सूर्य उगवला आहे_नव्या क्रांतीचा

मुली,तुझे प्रसाधन आटोप लवकर
पदर खोच कमरेला_दारापुढे मोर्चा आहे.

□□□

## ज. वि. पवार

### तुरूंगातली पाखरे

झिंदाबादचा मुर्दाबादचा जयघोष करत आगीचा लोळ आता पुढे येतोय्
अटकाव करू पहाणाऱ्या समुद्रातही वडवानल जन्म घेतोय्

आता अटकाव कसला : धमनीधमनीने ज्वालामुखी व्हायचे
इंचाइंचागणिक खंदक खणत जायचे

कारागृहाची भीती कुणाला ? उभं आयुष्य तुरुंग समजून सहनलं
हेही बरंच झालं : तुरुंगाच्या पायथ्याशी सुरुंग पेरणं शक्य झालं

किती जेल्स_किती बरॅक्स_याचा एकदा हिशेब करा
उधाणलेल्या समुद्राला बांधणार कसं याचं एकदा गणित मांडा.

समतेचं वारं प्यालेली_त्यांना असं डांबू नका
तुरुंगासह ती उडून जाणार नाहीतच अशा भ्रमात राहू नका.

□□□

# मल्लिका अमरशेख

## संभावित सूर्यासारखे

संभावित सूर्यासारखे तुम्ही नेहमीच निर्विकार असता
नित्यनेमाने पाठ फिरवून चालायला लागणारे.
तुमचे विचार मुरलेल्या लोणच्यासारखे बंद बरणीत.
सारं पंचतंत्र तोंडपाठ असतंय् तुम्हाला.
तुम्ही हुकुमाचे पत्ते हातात ठेवूनच नेहमी खेळता.

आमच्या आयुष्याच्या नाक्यानाक्यावर वासुगिरी करणारे
तुमचे लंपट शब्द,
आमच्या सगळ्या आयुष्याला फोरासरोड करणारी
तुमची चवचाल नाण्यांची रास,
तुमच्या घरांपुढं उच्च विचारांची रांगोळी असते;
रंगीत शोभिवंत ठिपक्याला ठिपके जोडून काढलेली.
काचेरी बिलोरी शोकेसमध्ये
तुम्ही ठेवता चमकदार सप्तमूल्ये.
सिग्रेट फुंकल्यासारखं तुम्ही बोलता
मानवतेच्या मूल्यांवर.

हरिण डोळ्यांनी बघत असलेलं आमचं आयुष्य
किती दिवस करायची साठमारी
अशी स्वतःच्याच रक्ताची ?
खरंच का उधाणत नाही कणाकणांतला द्वेषसंताप ?
प्रत्येक शहराच्या नाक्यावरून पाण्याऐवजी
का नाही कारंजी उडत फुत्कारण्याऱ्या रक्ताची ?
किती वेळ नुस्तं पहात राहणार
बळी चाललेल्या बोकडाचे डोळे ?
प्रत्येक जण थडगी फोडून बाहेर का निघत नाही ?

या वारुळत्या शहरात रक्ताळलेला गुलमोहर,
आणि गटाराच्या खिडकीत
वेश्या होऊन पडलेली पौर्णिमेची रात्र...

मला हे पहायचं नाहीय्
आणि मला हे संपवायचंय् सगळं...
असं डोळे मिटून काही होणाराय् का ?

इथल्या प्रत्येक लहान पोराच्या
डोळ्यात असणारं वठलेलं झाड
इथल्या प्रत्येक आईचा पदर
असंख्य जळवांनी भरलेला,
हे सगळं पहातां डोळे मेणाचे होतात
आणि मन होतं अश्वत्थाम्याची चिरंजीव वेदना.

□□□

# प्रकाश जाधव

## माणूस नामका धरम्

रात धुंड्या दीस धुंड्या
पर कोन आयताच गवश्या नय

पीर धुंड्या दरगा धुंड्या
पर होनी को किसने टाल्या नय

जुम्मेसे बैठ्या मह्यनेसे बैठ्या
पर हज का पानी आव्या नय

खुद को धुंड्या माळरान धुंड्या
कोन पाक नजर गवश्या नय

दिस भाय धुंड्या रात बेगम धुंड्या
पर माणूस नामका धरम गवशा नय

□□□

## मरण

आज संपू दे आहुतींचे सोवळे संदर्भ
आज विझू दे अध्यात्माचे सनातन यज्ञ
उद्या आणिक एक पाहीन
रक्ताचे नाते उध्वस्त होतांना
प्रथाच पडून गेलेय आता
सूर्याला नागडं करायची आणि उल्केचे कासोटे फेडायची
मलाही एक सवय जडलेय आताशः
दगड फेकून आकाश फाडायची
मेल्यागेल्याचं दुःख होतं. संताप येतो
पण रोटी शेकल्यावर विस्तव जळला काय नि विझला काय
सारखंच.
मारणाऱ्यांनी मारत रहावे
मरणाऱ्यांनी मरत रहावे
आया बहिणींची स्वस्त मरणे पहातां पहातां
लोकशाहीतील क्षुधित घुबडे
उद्या माझेही मरण घेऊन उभी असतील माझ्या बायको समोर
निर्वस्त्र.

□□□

## त्र्यंबक सपभाळे

### ...तर मी काय करू ?

आता रडू
कोणा कोणासाठी ?
आहेत कुठे
माझ्या डोळ्यांत अश्रू ?
कोरड्या पापणीतून निघतात
विद्रोहाच्या ठिणग्या
त्यांनी पेट घेतला तर मी काय करू ?
माझ्या जीवनाच्या
बंद केल्या तू सर्व वाटा
उडी घेताना
मृत्यूच्या कड्यावरून
तुझ्या मानेवर,
माझे दात तुझ्या गळ्याला लागले तर मी काय करू ?

चिपाडागत
झाला माझा देह या हिंदवी संस्कृतीच्या गुऱ्हाळात
माझ्या रसावर तरारलेल्या लतावेली
सावलीला यायची
मलाच करती बंदी
या चिपाड देहाने
पेट घेताच,
सुक्याबरोबर ओले जळू लागले तर मी काय करू ?

कंबर झाकावी असे काय उरले आहे ?
चिरगुटं तरी
कुठं ठेवली आहेत ?
स्वातंत्र्याच्या पाव शतकात
सगळ्यांनाच मिळाले स्वातंत्र्य
ते ओढून नेण्याचे
असा मी दिगंबर
त्या आदिमायेच्या मागे धावताना

'नंगे से खुदा डरे' ठरलो तर मी काय करू ?

माझे पोटच झाले कब्रस्तान
प्रत्येक धर्माचे धर्मग्रंथ
घेत आहेत चिरशांती
माझ्या पोटाच्या कक्षा
वाढत वाढत जाऊन
त्यात धरती सामावू लागली तर मी काय करू ?

नाळ तोडल्यावर
तू आपल्या जीवन प्रवाहातून मुक्त केले
हे भारतमाते ! त्वां मला प्रेम-वात्सल्य केव्हा दिले ?
या कालप्रवाहात मी कर्ण न होता
ईडीपस होऊन तुझ्या शय्येवर आलो तर मी काय करू ?

□□□

## बा. स. हाटे

### फाटलेली जिंदगी

फक्त फाटलेली जिंदगी शिवून द्या बाईसाहेब,
मी कदीबी साळंत गेली न्हाय
_पन शिक्षान म्हणजे वाघिणीचं दूध हाय
ज्याला मिळल ते डरकाळल्याशिवाय राह्यचं नाय
असं म्हनाला हुता बाबासाहेब-
कंच्यातरी शाळंला त्याचं नाव देऊ नये म्हून
एवढा त्येगा झाला- गाव न गाव पेटला
माजं बी घर जळीत झालं,याचं काय नाय
घर काय आजचं उद्या उभं राहातं.
फक्त फाटलेली जिंदगी शिवून द्या बाईसाहेब.

घराचा धूर आभाळात गिरक्या घेतोय,
मेलेल्या पोराचा हुंदका गळ्यात अडकतोय,
जळलेल्या दाण्यांचा ठसका बसतोय
दुसऱ्याचा कळवळा काळजात थरकतोय
उन्हात जिवाचा काहिलीसारा भडका होतोय
ह्ये एवढं आभाळ कोसळलं
जगण्यासारखं तरी काय उरलं ?

राखंच्या ढिगाऱ्यावर बसून ऱ्हायलो_
घरादारावर नांगर फिरला,
दोन दिवस पाण्याबिगर गेले,
आंब्याच्या झाडाखाली
बापुडवाणं पडून राह्यलोय.
बेहोशीच्या अंधारात मेलो
_मांडीवर गिधाडानं चोच मारली
तवाच सुधीवर आलो.
भर दुपारी टारून फाटलो मरन्याचं दुःख नाय
फक्त फाटलेली जिंदगी शिवून द्या बाईसाहेब.

□□□

# भगवान भोईर

## उन्हातलं झाड

कोंबडा आरवला, नि
बाने फळी मांडली,
रापीला धार लावली निसण्यावर
कुंडावर गेला
चामडं साफ केलं.

च्या प्याल्यावर
पुन्हा फळी मांडली,
चामडं घेतलं; कापलं.
पाटलाच्या पोराचं लगीन,
नक्षीबाज जोडा बनवायला घेतला.
बाने अकराच्या आत
पालिसबिलिस लावून
चमकावून जोडा बनवला.
बच्यापाशी दिला.

मटणाची पंगत मिळंल म्हणून
बाच्या पाठीपाठी मी निघालो.
आग्नीचे दिस ते_
सूर्यबाप्पा सकाळपास्नंच आग ओकायचा
रस्त्याची धूळ लय गरम झालेली
नुस्ती कुत्र्यावानी चावा घ्यायची.

मी म्हटलं,
"ब, पाय लय लासत्यात ग,'
ब म्हणाली
"पलसाच्या पानांचा बूट बनव,"
मी म्हटलं,
"काय ग ब, आपुन दुसऱ्यांना पायताण देणार
पर आपलेच पाय उघडे बोडके."

ब माझी लय शानी
म्हणते कशी,
"झाडांनी सवता तापायचं उन्हात
पर दुसऱ्यांना, सावली द्यायची !
आपुन म्हंजे झाडच की,
सदाचं उन्हात असलेलं !!

□□□

# भुजंग मेश्राम

## बजारहाट

बजाराबद्दल तू आसी विच्यारते ये माय
जस कही तुह आताच झालं लगीन
न् ठावुक नोसाव बजारभाव
साइटवर बी तू लय पुस्ते माय खोदू खोदू
बजारात बायाच काहून जातेत ?
बजार कराले काय टोकलीच फायजे ?
खरं सांगु, माह्या सर्क्या रांडवला बजारसाटी
कोण हाये ? पोरालो आणाव मन्लं
बजार दाक्वासाटी, तू असी कोन्ची मजूरी ?

भरोशाच्या म्हसीने हाल्या द्यावं तसा,
हरेक हाट फुस्काच निंगतो मह्यासटी
जास्त काय गुळ, मिर्ची, भातका, पत्ती
पोरासाटी पाटी लेक्नी
ज्यासाटी गेला आसलं दोन मयनाचा औधी
पोराले आणाव वाट्टे सम्दं
पर यकेक बटवडा अस्राच जाते खाली
अस्या टेमाली हाटाले जातानी
रुसणाऱ्या पोराले घरात कोंडा लाग्ते आंदी.

बजार, आये बजार मंजी
भरल्या चंचीन जे वाट्टे फाव, ते बजार
आता तू मन्शीन
मंग एवढ्या बाया काहून जातेत
ज्यैच्या पोटात पाण्यासिवा काई नस्ते आदार
माय, गोस्टी बी लय महागल्या आता
'दिवाळीतले पिक आन् सिमग्याले भिक'
आता दररोज सांच्याला
चरून आल्या गाईवानी फिरून येते फिकीर
कोणाकोणापुडी उघडं करावं व काळीज ?

जी भेटली ती अस्सी बोलते
जसं पेरणी झाल्यावर सुचावं उदिम
लय झोका वाट्टे की, अस्यायची कराव धुम्मस
किती बी चोपाव मन्लं सबुद
मातर माहं असं की, दुसऱ्याला नै दुकवू
आगर घेऊ नै दुकवाचा चानस

बाया मंतेत तू पोराले साइटवर काहून नै आणत ?
मी काई मन्लं तू अस्सं होत तोंड वाकडं
कडूझक आवशद घेवावं जस,
तवा त्यैचे कान नस्तेत आयकाला काहीयक
'मी मने नाई खात
मन महे महा त्याग
भरडले जवा चणे
तू अकेका फोलात दोन दोन दाणे'
त्यैला वाट्टे मी हाव खालमान्या गाईवानी :
कोन्चया भापेत सांगाव त्यैला
की, मझ्या लेंकाजवळ लेक्नी सिवा
आता काईच देआचं नही.

तू मंते, बजारातून काईच आणत नै पोरासाटी ?
माय, बजार मंजी महया सपनांची पात
आन् पोर्ग ? - अखीर लेकराचीच जात
कवा कोन्ची गोस्ट आवडल त्येले
सांगता येवाचं नही
तुला ठावूक आसलं, बजारामंदी
दगडाच्या जात्यापासून सेंदरापावतोर आजकाल
लय विकरा हाय.
पोराले आता तू फुटू लागले विखाते दात
आन दिसू लागली पैदलवाट
मी या रस्त्यांना काहून विकावं त्येचे पाय

पर्वा पडलं सपन. सपनात व्हती मही पुटपुट.
आता घालू मनीन पोराची समजूत
तू पोर्ग मनील, आता घरात कोंडून राहणार नै
बजार दाकव नै तू पाटी घे !
आन खरं सांगू ? पोराले आज दाकवला बजार
कोसाकोसावर्चे दगड_जादुगारापुडचा जुलूस_
बटवड्याची कापणी_ गर्दीचं अंधारहिव_
जिती साप्नं बी जळू लाग्तेत भुरूभुरू-
पोराले दिली घेऊन्न काळ्या रेघांयची वही
आन् माइच बा, बजारावरचं त्येनं लेहणं केलं सुरु

_आता कोन्ता धडा पोराले सिकवू !

□□□

## जांगड

त्यांच्या धर्मपीठात गेल्यावर
एक म्हणाला,
'हामी यादव कुळातले'
दुसरा बोलला,
'हामी सेटल झालेले भटके'
तिसरा रडला,
'ढालिया हाव म्हणून काय झाले ?'
चौथा हसला,
'हामी अंधारातले लंबाडे'
हे सर्व शांतपणे ऐकल्यावर
'तरीपण तुम्ही जांगड कसे रे ?'
ते सर्वजण बघू लागले एकमेकांकडे:
तर दिसलेत निव्वळ हडप्पाचे सांगाडे.

उत्तराच्या शोधात ते शिरले म्यूझिअममध्ये
म्हणतात, तिथून ते परत नाही आले–

□□□

# कवि परिचय

## कुसुमाग्रज - वि. वा. शिरवाडकर

*'कुसुमाग्रज' ह्या नांवाने काव्यलेखन व इतर लेखन श्री. वि. वा. शिरवाडकर ह्या नांवाने. गेली साठ वर्षे सातत्याने पूर्ण वेळ लेखनात मग्न. 'विशाखा' हा पहिला कवितासंग्रह. अनेक काव्यसंग्रह प्रकाशित. 'नटसम्राट' ह्या नाटकास साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला असून 'ज्ञानपीठ' पुरस्काराने त्यांच्या एकूण साहित्याचा गौरव करण्यात आला आहे.*

*जन्म : १९१२*

## अण्णा भाऊ साठे

*सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्म. प्रख्यात कादंबरीकार, कथाकार, लोकशाहीर म्हणून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात व जनचळवळीत आघाडीवर. यांची कित्येक गीते, पोवाडे व तमाशे आहेत. 'लोकनाट्य' चळवळीचे प्रमुख आधारस्तंभ. यांच्या अनेक कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत. पहिल्या दलित साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष.*

*जन्म : १ ऑगस्ट १९२०   मृत्यू : १८ जुलै १९६९*

## नारायण सुर्वे

*यांचे संपूर्ण नांव नारायण गंगाराम सुर्वे. लहानपणापासून अत्यंत खडतर अनुभव घेतले. 'ऐसा गा मी ब्रह्म !', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा', 'सनद' ही गाजलेली पुस्तके, महाराष्ट्र सरकारची पारितोषिके, त्याचप्रमाणे सोव्हियत लँड नेहरू पारितोषिक व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे पारितोषिकही मिळाले. रशियाचा दोनदा प्रवास. लोकवाङ्मय प्रकाशनगृह या संस्थेच्या ललितसाहित्य विभागचे सल्लागार. अत्यंत प्रभावी काव्यवाचन करणारे म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत.*

*जन्म : १५/१०/१९२६*

## दया पवार

*यांचे संपूर्ण नांव दगडू मारूती पवार. आरंभीच्या काळात परळच्या पशुवैद्यक महाविद्यालयात प्रयोगशाळेत साहाय्यक-कारकुनाचे काम त्यांनी केले. पश्चिम रेल्वेच्या कार्यालयातून ऑडिटर म्हणून नोकरीतून निवृत्त !'कोंडवाडा' हा त्यांचा प्रसिध्द कवितासंग्रह. १९७४-७५ चे महाराष्ट्र शासनाचे प्रथम प्रकाशन पारितोषिक त्याला लाभले. 'बलुतं' हे*

अत्यंत गाजलेले आत्मचरित्र, त्यांना फोर्ड फाऊंडेशन' शिष्यवृत्ती मिळाली. 'बलुतं' पुस्तकावरच 'बलात्कार' हा बोलपटही निघाला. 'विटाळ' हा कथासंग्रह, 'चावडी' हे मिष्कील व अंतर्मुख करणाऱ्या चटकदार ललितगप्पांचे पुस्तक प्रसिध्द झाले आहे. ते 'पद्मश्री' ही आहेत.

जन्म : १५ सप्टेंबर १९३५

## केशव मेश्राम

पूर्ण नांव केशव तानाजी मेश्राम. अकोला आणि मुंबई शहरात शिक्षण पूर्ण केले. सहा वर्षे पश्चिम रेल्वेच्या कार्यालयात कारकुनी केली. दोन वर्षे महाडला आंबेडकर महाविद्यालयात व १९६५ पासून महर्षी दयानंद कॉलेज येथे मराठीचे प्राध्यापक, सध्या विभागप्रमुख आहेत. 'उत्खनन', 'जुगलबंदी' व 'अकस्मात' हे कवितासंग्रह, दोन कादंबऱ्या, दोन ललित गद्याची पुस्तके, तीन कथासंग्रह, तीन समीक्षापर लेखसंग्रह, बालकथासंग्रह व संपादित पुस्तक अशी पंधरा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'हकीकत व जटायू', 'उत्खनन', 'पोखरण' व 'पत्रावळ' या चार ग्रंथांना महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कार लाभला. 'अस्मितादर्श' लेखक-वाचक मेळाव्याचे (१९७८) अध्यक्ष होते.

जन्म : २४ नोव्हेंबर १९३७

## यशवंत मनोहर

नागपूर विद्यापीठातील मराठी विभागत मराठीचे प्राध्यापक म्हणून काम करतात. स्वत: डॉक्टरेट प्राप्त केल्यामुळे पी.एच.डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. 'उत्थानगुंफा', 'मूर्तिभंजन' आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील दीर्घ काव्य' ही त्यांची कवितांची पुस्तके. 'दलित साहित्य : सिध्दांत आणि स्वरूप' हे दलित साहित्याच्या कलामूल्यांचा व त्यातील सौंदर्यस्त्रोताचा विचार करणारे पुस्तक, 'स्वाद आणि चिकित्सा' हा समीक्षा लेखांचा संग्रह ही त्यांची प्रसिध्द झालेली पुस्तके आहेत.शाहिरी वाङ्मय आणि मराठीतील लोकसाहित्य हा ग्रंथ व स्मरणिका प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

## नामदेव ढसाळ

यांचे पूर्ण नांव नामदेव लक्ष्मण ढसाळ. एस.सी.सी. पर्यंत त्यांचे शिक्षण झाले असून 'दलित पँथर' ह्या संघटनेचे दिर्घ काळपर्यंत सक्रीय कार्य मोठ्या जोमाने केले. वैचारिक

*मतभेदामुळे व अंतःस्थ कलहामुळे विभाजित झालेल्या पँथर गटाचे सध्या नेते आहेत. नाकारलेल्या समाजाला परिपूर्ण न्याय मिळावा म्हणून विविध लढे संघटित करीत असतात. 'गोलपिठा', 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले', 'प्रियदर्शनी-आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र', 'तुही इयत्ता कंची', 'खेळ व गांडू बगीचा' हे कवितासंग्रह, 'गोलपिठा' व 'तुही इयत्ता कंची' यांना राज्य पुरस्कार लाभला. त्याचप्रमाणे सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कारही त्यांनी मिळविला. 'हाडकी हाडवळा' ही कादंबरी प्रसिध्द आहे.*

*जन्म : १५ फेब्रूवारी १९४९*

## हिरा बनसोडे

*पूर्ण नांव हिरा गुलाबराव बनसोडे. घरात माहेरी किंवा सासरी फारसे कुणी शिकलेले नसल्याने शैक्षणिक किंवा वाङ्मयीन वारसा मिळण्याची शक्यताच नव्हती.'पौर्णिमा' हा पहिला कवितासंग्रह. पण त्यांचे वैशिष्ट्य जाणवते ते 'फिर्याद' या दुसऱ्या कविता संग्रहातून. दलित स्त्रीवर होणारा अन्याय, तिची परवड, तिचा सोशिकपणा व संयम या सर्व भावनांचे तरल व प्रत्ययकारी आविष्करण त्यांच्या कवितांतून घडते. विविध संस्थांकडून त्यांच्या काही कवितांना पारितोषिके मिळाली आहेत.*

*जन्म : १ ऑक्टोबर १९३९*

## वामन निंबाळकर

*यांचे पूर्ण नांव वामन सुदाम निंबाळकर. ऐन उमेदीच्या वयापासूनच विविध सामाजिक चळवळीत सक्रीय सहभाग घेऊ लागले. 'भीमसंदेश' साप्ताहिकाचे व त्यानंतर 'सा.प्रबोधन'चे संपादन. साहित्य कला विकास मंडळ, 'मिलिंद साहित्य परिषद' या संस्थांचे संस्थापक सदस्य. 'अस्मितादर्श' चे काही काळ एक संपादक. 'डॉ बाबासाहेब आंबेडकर अध्ययन मंडळ' नांवाच्या संस्थेची स्थापना. अनेक कविसंमेलनात सहभागी. पँथरचे सक्रीय कार्यकर्ते व त्यासाठी तुरुंगवासही भोगला. 'गावकुसाबाहेरील कविता', 'अस्मितादर्शची नऊ वर्षे', 'बौध्दांच्या सवलती आणि पंतप्रधानांचे वक्तव्य' व 'दलित साहित्य : स्वरूप आणि भूमिका' ही पुस्तके प्रकाशित.*

*जन्म : १९३९*

## अर्जून डांगळे

*यांचे पूर्ण नांव अर्जुन ठमाजी डांगळे. मुंबई विद्यापीठाची मराठी विषयातील एम्.ए. ची पदवी मिळविली. महाराष्ट्रात चैतन्य निर्माण करणाऱ्या 'दलित पँथर' या संघटनेचे एक संस्थापक. कविता, कथा आणि वैचारिक लेखन, कॉलेज जीवनापासूनच राजकीय व सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग. 'छावणी हलते आहे' हा कविता-संग्रह, 'ही बांधावरली माणसं' आणि 'दलित साहित्य : एक अभ्यास' हे संपादन अशी ही तीन प्रकाशित पुस्तके. 'दलित साहित्य संसद' या संस्थेचे कार्यवाह. समाजजीवनात मूलगामी बदल घडून मानवी प्रतिष्ठा पुर्नप्रस्थापित व्हावी म्हणून जे जे प्रयत्न केले जातात त्यात अर्जुन डांगळे या ना त्या प्रकारे सहभागी असतात.*

*जन्म : १५ जून १९४५*

## प्रल्हाद चेंदवणकर

*यांचे संपूर्ण नांव प्रल्हाद नामदेव सोंडे सुलतान असे आहे. आपल्या एका जिवलग मित्राच्यासाठी त्यांनी चेंदवणकर असा बदल करून घेतला. मुंबई विद्यापीठातून १९६८ मध्ये बी.कॉम. ची पदवी प्राप्त केली. कथा, कविता आणि समीक्षात्मक लेखन प्रसिध्द, 'ऑडिट' हा कवितासंग्रह १९७५-७६ चे उत्कृष्ट पुस्तक म्हणून पुण्याच्या मराठी साहित्य परिषदेकडून स.ह. गोखले पारितोषिक मिळाले. 'ऑर्डर ऑर्डर' हा दुसरा कवितासंग्रह प्रसिध्द झाला आहे. आत्मचरित्र लेखनाचा संकल्प चालू आहे.*

*जन्म १५ जुलै १९३७.*

## माधव कोंडविलकर

*पूर्ण नांव महादेव गुणाजी कोंडविलकर. शालेय शिक्षण खऱ्या अर्थाने सातवीपर्यंत. काही दिवस मुंबईच्या रात्रशाळेत. पुढे एस्.एस्.सी. परीक्षा पास. 'इटूकले राव' हा बालगीतांचा संग्रह, 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या आत्मपर लेखनाला राज्य सरकारचा पुरस्कार व फ्रेंच भाषेत अनुवाद. अजून उजाडायचंय, अनाथ इत्यादी कादंबऱ्या व कथासंग्रह प्रसिध्द आहेत.*

*जन्म : १५ जुलै १९४१*

## ज्योती लांजेवार

*यांचे पूर्ण नांव ज्योती बाबूराव लांजेवार, शालेय आणि पदवी व पदवीनंतरचे शिक्षण नागपूरमध्ये पूर्ण केले. आई लढाऊ वृत्तीची असल्यामुळे विषमता आणि सामाजिक अन्यायाची चीड यांचे बाळकडू त्यांना बालपणापासूनच लाभले.'दिशा' हा पहिला कवितासंग्रह, 'झेप' हा दुसरा संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर. समाजिकता हा त्यांच्या कवितेचा प्राण आहे. मानवतेच्या आणि समानतेच्या प्रतिष्ठापनेसाठी क्रांतिकारक नवविचारांची पेरणी करणारी त्यांची कविता संसूचन करणारी आहे. सध्या पी.एच.डी. चा अभ्यास करीत असून नागपूरच्या श्री. बिंझाणी नगर महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापिका आहेत. वैचारिक व वाङमयीन लेखांचा संग्रहदेखील प्रकाशनाच्या वाटेवर आहे.*

*जन्म : २५ नोव्हेंबर १९५०*

## ज. वि. पवार

*जयराम विठ्ठल पवार. सिध्दार्थ महाविद्यालय मुंबई येथून मराठी व तत्वज्ञान या विषयांत बी. ए (ऑ.) ची पदवी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या दलित मुक्तीलढ्याच्या चळवळीत प्रामुख्याने झोकून देणारांपैकी एक महत्वाचे खंदे कार्यकर्ते. 'बलिदान' ही चळवळीचे श्रेष्ठत्व सांगणारी कादंबरी आणि 'नाकेबंदी' हा कवितासंग्रह प्रकाशित. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील निवडक कविता 'उच्छवास युगंधराचे' ह्या नांवाने संपादित केल्या आहेत.*

*जन्म : १५ जुलै १९४४*

## मल्लिका अमरशेख

*शालेय आयुष्यापासून कला, नृत्य व अभिनयाची चांगली समज यांना आहे. कविता, नाटक, कथा, नृत्य, संगीत आणि अभिनय ही अंगे. शालेय जीवनात नाशिकच्या कलायतन ह्या संस्थेने १९७१-७२ 'सर्वोत्कृष्ट बाल कवयित्री' म्हणून प्रथम पुरस्कार दिला होता. 'वाळूचा प्रियकर' हा कवितासंग्रह प्रसिध्द झाला आहे. 'मला उदध्वस्त व्हायचंय' या आत्मपर ग्रंथाने खूप खळबळ उडविली. स्वतःच्या प्रतिक्रिया तिखटपणे व कोणाचाही मुलाहिजा न ठेवता अभिव्यक्त केल्या आहेत. दोन कादंबऱ्या प्रसिध्दीच्या मार्गावर. सध्या 'नंतर' या मासिकाच्या निर्मितीत आणि संपादनात व्यग्र.*

*जन्म : १६/२/१९५६*

## प्रकाश जाधव

*ऐन तारुण्यातच आयुष्यातील सर्व विदारक अनुभव वाट्याला येणारा हा कवी, जेमतेम मॅट्रिकपर्यंतच शिकू शकला. शिक्षण एवढेच. समज आल्यापासून कुटुंबातल्या दारिद्र्याने आणि आर्थिक ओढगस्तीने पाठपुरावा केला. वर्तमानपत्रे टाकली, कॅन्टिनमधे काम केले. प्रेसमधे पडतील ते कष्ट उपसले. अनेक कारखान्यात, राहू देतील तोपर्यंत तऱ्हे-तऱ्हेची कामे केली. विद्रोही कवितेच्या दुसऱ्या दशकातील अग्रक्रमाचे नाव म्हणून, जाधव यांचा उल्लेख करावा लागेल. 'दस्तऐवज' हा त्यांचा कवितासंग्रह.*

*जन्म : ३ नोव्हेंबर १९५१ .*

## त्र्यंबक सपकाळे

*यांचे संपूर्ण नांव त्र्यंबक सांडू सपकाळे. प्रत्यक्ष शिक्षण जरी मॅट्रीकपर्यंत झालेले असले तरी आयुष्याकडून त्यांना खूप शिकायला मिळाले. सवर्णांच्या व गावकऱ्यांच्या जाचामुळे बालवयातच बहिष्काराचा धडा मिळाला. जगण्यासाठी वडीलांना गाव सोडावे लागले. गाडीभाड्याला पैसे नसल्यामुळे खूप पायपीट करावी लागली. दुखणारे पाय. दोरी बांधून वेदना शमवल्या. 'सुरूंग' हा कवितासंग्रह प्रसिध्द.*

*जन्म : २२ एप्रिल १९३०*

## बा. स. हाटे

*यांचे पूर्ण नांव बाळ सज्जन हाटे. रायगड जिल्ह्यातील दासगाव या गावी त्यांचा जन्म झाला. बालपणापासून अवतीभवती घडणाऱ्या चळवळीचे प्रभावी तरंग त्यांच्या मनाला अस्वस्थ करू लागले होते. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे जी चवदार तळ्याच्या संघर्षाची चळवळ केली तिने सगळा परिसरच भारून टाकला होता. त्यावरच 'जिथं पाणी पेटलं' ही संदर्भपुस्तिका हाटे यांनी लिहिली. कविता लेखनही विपूल केले आहे. 'रक्तखुणा' हा प्रसिध्द झालेला कवितासंग्रह. डॉ. आंबेडकरांच्या चळवळींना कादंबरीरूपाने शब्दबध्द करण्याचा संकल्प त्यांनी सोडला असून त्यापैकी 'युगविधान' ही कादंबरी प्रसिध्द झालेली आहे. 'युगंधर' आणि 'युगान्त' या कादंबऱ्या प्रसिध्दीच्या मार्गावर आहेत.*

*जन्म : ११ डिसेंबर १९३६*

## भगवान भोईर


*यांचे पूर्ण नांव भगवान रामा भोईर. ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यातल्या कोने नावाच्या खेडेगावात त्यांचा जन्म झाला. मुंबई विद्यापीठात एम्.ए. ची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून १९७१ ते १९७७ पर्यं नोकरी केली आणि १९७८ पासून भिवंडी महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक. कवितेबरोबर ललित गद्य, कथा, व वैचारिक लेखन सातत्याने करीत असतात. ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या दुःखाचे व आशाआकांक्षाचे पृथगात्म दर्शन त्यांच्या कवितेत घडते. 'उन्हातलं गांव' हा कवितासंग्रह प्रकाशित.*

*जन्म : १ जून १९५०*

## भुजंग मेश्राम

*तरूण दलित आदिवासी कवी. १९७६ पासून काव्य लेखनास आरंभ. यांची सर्व कविता विविध पातळ्यांवर अवतरते. मुख्यतः दलित व आदिवासी जीवनातील ताणतणाव, संघर्ष यांचे चित्रण करते. 'उलगुलान' हा त्यांचा १९९० साली प्रकाशित झालेला पहिलाच काव्यसंग्रह. 'उलगुलान' म्हणजे एकाचवेळी सर्व क्षेत्रात उठाव करणे, असा त्याचा अर्थ आहे.*

124277
31-3-08




Library IIAS, Shimla
MR 891.461 8 Su 79 D
00124277

संपादक: नारायण सुर्वे

# दलित काव्यदर्शन

MR
891.461 8
Su 79 D

MR
891.4618
Su 79D

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# दलित काव्यदर्शन

संपादक

**नारायण सुर्वे**

लोकवाङ्मय गृह

Entered

Library IIAS, Shimla
MR 891.461 8 Su 79 D
00124277

**दलित काव्यदर्शन** / संपादक : नारायण
Dalit Kavyadarshan / Narayan Surve

म / ६३९
पहिली आवृत्ती : ३० ऑगस्ट १९९२ 30 Aug. 1992
दुसरी आवृत्ती (I) : फेब्रुवारी २००० Feb 2000

124277
31-3-08

मुखपृष्ठ : कमल शेडगे

MR
891.4618
Su79 D

मूल्य : ४० रुपये
Rs 40.00

ISBN 81-86995-82-X

मुद्रक/प्रकाशक :
प्रकाश विश्वासराव Prakash Vishwasrao
लोकवाङ्मय गृह Lokvangmaya
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
मुंबई - ४०० ०२५ Mumbai

मुद्रण स्थळ :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत

*महात्मा जोतीराव फुले*

आणि

*भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर*

ह्यांना आदरपूर्वक

# काव्यदर्शनापूर्वी . . .

मराठी साहित्याचा इतिहास फार जुना आहे व त्याच्या केंद्रस्थानी कविता प्रमुख आहे. वाङ्मयाच्या प्रमुखस्थानीही 'काव्य' हाच कलाप्रकार प्रथम मानाचे पान म्हणून अवतरलेला आहे. संवेदनांचा प्रथम आविष्कार म्हणजे काव्य किंवा काव्याच्या रूपानेच व्यक्त होतो असेही म्हटले जाते. मराठीत कालखंडाच्या क्रमाने पाहिल्यास १. संतवाङ्मय, २. पंडिती काव्य, ३. शाहिरी वाङ्मय, ४. आधुनिक मराठी कविता असे ठळक टप्पे मानले जातात.

आधुनिक मराठी साहित्याचे वय, ज्यात कविता ही शीर्षस्थानी आहे, सव्वाशे वर्षांचे आहे. सर्वसाधारणपणे लेखनाच्या क्षेत्रात सुशिक्षित वर्ग किंवा पांढरपेशा वर्गच प्रमुख होता व ते स्वाभाविकही होते. शिकलेला वर्ग तोच होता. लिहिणारा-वाचणारा किंवा ज्ञानसाधना करणाराही तोच होता, त्यामुळे त्याची सुखदु:खे ही एकूण मराठी लोकांची सुखदु:खे असे मानले जाऊ लागले. परंतु ते खरे नव्हते. स्वातंत्र्यानंतर सर्व थरांत शिक्षण पोचल्यावर त्या त्या समाजघटकातून नवी शिक्षित पिढी पुढे आली आणि त्यांच्या लेखनाने मध्यमवर्गीय किंवा पांढरपेशी लेखनाचे मर्यादित स्वरूप उघड केले. शिक्षण पसरू लागले आणि साहित्याच्या कक्षाही रुंद होत चालल्या.

स्वतंत्र भारतात खेड्यापाड्यात शिक्षण पोचल्याने समाजातील सर्व थरांतील तरुण पिढी शिकू-वाचू लागली. ती लिहूही लागली. मराठी साहित्यात एक नवे चैतन्य उफाळून आले. स्वाभाविकपणेच आमचा दलित बांधव जो गावकुसाबाहेरचे असह्य व अमानुष जिणे जगत होता तोही बोलका होऊ लागला. त्याची अस्मिता जागी झाली. एकूण मराठी साहित्यात आपल्या जीवनाचे 'दर्शन' कोठे आहे, हे तो शोधू लागला. त्याच्यात एक नवे मन्वंतर घडले आणि ते 'दलित साहित्या'च्या रूपाने व्यक्त होऊ लागले. नवे जागरण सुरू झाले. नवा आत्मस्वर मिळाला. ह्या सर्व उठावाच्या केंद्रस्थानी महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महनीय कार्य आणि क्रियाशील विचारवंत म्हणून त्यांची प्रेरणा दीपस्तंभासारखी उभी राहिली.

मराठी कवितेत दलित कवितेच्या रूपाने नवा कालखंड सुरू झाला. इतिहासानेच नवी धडक मारून एकूण मराठी साहित्याला भानावर आणले. ठराविक परिघात अडकलेले मराठी वाङ्मय अधिक विस्तारू लागले. ह्या नव्या वास्तवाने आपले नवे नायक व नवे कलावंत जन्माला घातले. त्याला मोठा वाचकवर्गही लाभला आणि दलित साहित्यप्रवाह महाराष्ट्रात रूढ होऊ लागला.

दलित साहित्य हे केवळ चातुर्वर्ण्यविरोधी किंवा स्वतःच्या सीमित जगापुरतेच पाहणारे साहित्य नाही तर ते समग्र मानवजातीच्या महान मुक्तिलढ्यात सामील होऊन त्या जययात्रेतील स्वतःच्या सिंहाचा वाटा उचलणारे साहित्य आहे. समग्र मानवजातीच्या मुक्तीतच दलित मुक्तीचालढा समाविष्ट आहे, हे लक्षात ठेवून व्यक्त होणारे साहित्य आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणालेच होते, "गुलामाला गुलाम असल्याची जाणीव करून द्या. मग तो बंड करून उठेल." तसेच पुढे ते एका ठिकाणी असेही म्हणाले होते, "मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की, उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये यांचा आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कार करा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका, तिचा विस्तार करा." हे विचार दलित साहित्याच्या केंद्रस्थानी आहेत.

दलित साहित्यातील प्रमुख व प्रभावी अभिव्यक्ती दलित कविताच आहे व तिचीच अधिक चर्चा होत राहिलेली आहे, होत रहाणार आहे. मराठी कवितेला हे एक मौल्यवान लेणेच लाभलेले आहे. ह्या

कवितेचा मूलस्त्रोत,तिची भाषा व आशय,तिची अंगभूत लय आणि शब्दकळा,एकूण मराठी काव्यातील तिचे स्थान व भवितव्य आदि सर्वच संभवनीयतेचा विचार होतच राहणार आहे.

मराठी कवितेतील प्रकट होत असणारा हा गतिमान प्रवाह सतत खेळता,वाहता रहावा म्हणूनच की काय,'दलित काव्यदर्शना'च्या रूपाने तो अधिकाधिक लोकांसमोर जावा किंबहुना प्रत्यक्ष दलित कविंना त्यांच्या कविता वाचायला न सांगता अगदी नवाच प्रयोग म्हणून तरुण,उत्साही नाट्यशिबिरार्थींकडून रसिकांसमोर सादर करावा, असा विचार महाराष्ट्रातील विख्यात नाट्य-दिग्दर्शक व नेहरू सेंटरचे प्रमुख प्रा.कमलाकर सोनटक्के यांच्या मनात आला.त्यांनी हा मनोदय बोलून दाखविला.मला देखील ही कल्पना आवडली आणि लगेच कामास लागलो.

युरोपात कवींच्या कविता सादर करणारा एक लहानसा वर्ग अस्तित्वात आहे, असे ऐकून होतो.ही मंडळी मूळ कवींच्यापेक्षाही अधिक उत्तमरितीने त्या त्या कविंच्या कविता सादर करतात. रसिक उभ्याउभ्यानेच त्या कविता ऐकतात व दाद देऊन पुढे होतात, असे मला पु.ल. देशपांडे ह्यांनीही एका बैठकीत सांगितल्याचे आठवते.मी स्वतः महाराष्ट्रात काव्यवाचनाचे कार्यक्रम सादर करीत असतो. परंतु त्या स्वतःच्या कविता असतात.इतरांच्या नसतात.तरीही हे काम मी अंगावर घेतले आणि आज तो उपक्रम आपणासमोर सादर होत आहे.

आणखी एक : दलित कविता फार मोठ्या संख्येने लिहिली जात आहे. परंतु त्या सर्वांचा समावेश ह्या छोट्याशा संग्रहात करणे शक्य नव्हते. काही निवडक कवीच निवडले आहेत. मुख्यतः विविधांगी पसरलेले दलित जीवनाचे दर्शन घडावे,त्यांच्या लकबी,अंगभूत लयी,वैविध्यता,प्रेरणा आणि मूलस्त्रोत ध्यानी यावेत,हा हेतू आहे.तरीही ह्या संग्रहात समाविष्ट होऊ न शकलेल्या कवींनी माझी असमर्थता ध्यानी घ्यावी,ही विनंती.

कवितांच्या निवडीपासून तो प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या सादरीकरणापर्यंत, तसेच हा काव्यसंग्रह तयार करण्याबाबत मला पूर्ण मोकळीक दिली त्या नेहरू सेंटरचे प्रमुख व माझे मित्र प्रा. कमलाकर सोनटक्के यांचे आभार मानतो. लोकवाङ्मयगृहाचेही आभार मानतो. ह्या सादरीकरणाच्या कार्यक्रमास सहभागी झालेल्या सर्व तरुण नाट्यशिबिरार्थींनाही धन्यवाद. त्यांनी ही जोखीम अंगावर घेतली म्हणूनच हे शक्य झाले.

म.जोतीबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृतिशताब्दी वर्षाच्या ह्या ऐतिहासिक सोहळ्यात ह्या नव्या उपक्रमाचे अखिल महाराष्ट्रातील रसिक व कवितेचे चोखंदळ चाहते स्वागत करतील, असा मला भरवसा वाटतो.

केशवसुत म्हणालेच होते,"**बाबा, जग हे बदलायाचे.**".त्या दिशेने हे सर्व यात्रेकरू निघालेत.सर्वांच्या सदिच्छा पाठीशी घेऊनच.

**नारायण सुर्वे**
३० ऑगस्ट,१९९२

---

**टीप :** ह्या सादरीकरणाच्या निवडीसाठी दलित कविंचे काव्यसंग्रह आणि प्रा. केशव मेश्राम संपादित 'विद्रोही कविता' ह्या संकलनाचा मोठाच हातभार लागला. सर्वांचे आभार मानतो.

इशें केलें नाहीं तुजसाठीं सर्व ॥ करूं नको गर्व ॥ प्राण्यांमध्यें ॥१ ॥
देह देऊनियां बुद्धिमान केला ॥ धनीपणा दिला ॥ सर्वांमध्यें ॥२ ॥
जगाच्या कल्याणा देह कष्टवावा ॥ कारणीं लावावा ॥ सत्यासाठीं ॥३ ॥
अशा वर्तनानें जन्माचें सार्थक ॥ संतोषी निर्मीक ॥ जोती म्हणे ॥४ ॥

**— जोतीबा फुले**
(महात्मा जोतीबा फुले : समग्रवाङ्मय)

"मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की, उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये यांचा आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कार करा. **आपले लक्ष आकुंचित, मर्यादित ठेऊ नका. ते विशाल बनवा.** आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरतीच बंदिस्त करू नका. **तिचे तेज खेड्यापाड्यातील अंधार दूर होईल असे प्रवर्तित करा.** आपल्या या देशात उपेक्षितांचे, दलितांचे फार मोठे जग आहे, हे विसरू नका. त्यांचे दु:ख, त्यांची व्यथा नीट समजून घ्या, आणि आपल्या साहित्याद्वारे **त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा, त्यातच खरी मानवता आहे."**

**— डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १. | कुसुमाग्रज | अनावरण / १ |
| २. | अण्णा भाऊ साठे | जग बदल घालुनी घाव / ३ |
| ३. | नारायण सुर्वे | सत्य / ४ |
| | | तुमचंच नाव लिवा |
| ४. | दया पवार | हे महाकवे / ६ |
| | | कोंडा |
| ५. | केशव मेश्राम | आमच्या वस्तीत / ९ |
| | | एक दिवस मी |
| ६. | यशवंत मनोहर | वैरी / १२ |
| | | कालचा पाऊस |
| ७. | नामदेव ढसाळ | डॉ. आंबेडकर १९८० / १३ |
| | | अंधाराने सूर्य पाहिला |
| ८. | हिरा बनसोडे | सखी / १७ |
| ९. | वामन निंबाळकर | माय / १९ |
| १०. | अर्जुन डांगळे | बलुतेदार / २० |
| | | युगाच्या इतिहासासाठी |
| ११. | प्रल्हाद चेंदवणकर | ऑडीट / २२ |
| १२. | माधव कोंडविलकर | वाढत होतो / २३ |
| १३. | ज्योती लांजेवार | कशाला जन्माला आलास ? / २५ |
| | | काळाजी गरज |
| १४. | ज.वि.पवार | तुरुंगातली पाखरे / २७ |
| १५. | मल्लिका अमरशेख | संभावित सुर्यासारखे / २८ |
| १६. | प्रकाश जाधव | माणूस नामका धरम / ३० |
| | | मरण |
| १७. | त्र्यंबक सपकाळे | तर मी काय करू ? / ३२ |
| १८. | बा.स.हाटे | फाटलेली जींदगी / ३४ |
| १९. | भगवान भोईर | उन्हातलं झाड / ३५ |
| २०. | भुजंग मेश्राम | बजारहाट / ३७ |
| | | जांगड |

# अनुक्रम

[illegible]

# कुसुमाग्रज

## अनावरण

मी तुमच्या पुतळ्याचं
बाबासाहेब
आज अनावरण केलं
(तुम्हाला कळलंच असेल.)
तुमच्या पुतळ्याला
डोळे मिटून भाविकतेनं
नमस्कार केला
( 'नाटक केलंस बामणा ?' )
नाटक ?
थोडंफार असेलही
लोकांच्या नजराच नाटकाला जन्म देतात
ते पृथ्वीवर वावरणाऱ्या
कोणालाच चुकत नाही
(ऐकलंय - 'जग ही रंगभूमी' वगैरे)
कबूल आहे, पण
सारंच नाटक नव्हतं
निमिषार्ध–
अगदी निमिषार्ध बाबासाहेब
माझ्या दृष्टीतून अवतरला
एक श्रध्दाशील श्रमण
बोधी वृक्षाच्या तळाशी बसलेल्या
तथागताकडे पाहणारा
( 'कविता करतोस काय यमक्या ?' )
नाही बाबासाहेब
'तुम्ही' हा विषय
कवितेत मावणारा नाही
हे पूर्वीच लक्षात आलंय माझ्या
रंगीत फुग्यामध्ये
आकाश पकडण्यासारखे
आणि तरीही
सहस्त्र कविता लिहिल्याचं

अपूर्व समाधान
त्याक्षणी मला मिळालं
( 'लोकांच्या टाळ्या घेतल्याचं ?')
तेही असतंच
कोणत्याही व्यासपीठावर
टाळ्यांची तोरणं बांधावी लागतातच
पण मला मिळालं
'ते' समाधान नव्हतं
तो एक अद्भूत 'अनुभव' होता
त्या क्षणार्धात मी
माझ्या संगमरवरी चौथऱ्यावरून
खाली-खोल-खोल, कोसळत गेलो
कड्यावरून दरीत
भिरकावलेल्या दगडासारखा
थेट पाताळापर्यंत, जेथे
'खाली' ही संज्ञाच
शिल्लक राहिली नव्हती
त्या तळावरून
मी तुमच्या पुतळ्याकडे पाहिलं
तेव्हा पुतळा दिसलाच नाही
दिसत होता, जाणवत होता
एक विराट दाहक तेजोगोल
सूर्याच्या कोरोनासारखा.

□□□

## अण्णा भाऊ साठे

### जग बदल घालुनी घाव !

जग बदल घालुनी घाव । सांगून गेले मला भीमराव ॥

गुलामगिरीच्या या चिखलात । रूतून बसला का ऐरावत ।
अंग झाडुनी निघ बाहेरी । घे बिनीवरती धाव ॥

धनवंतांनी अखंड पिळलें । धर्मांधांनी तसेच छळले ।
मगराने जणू माणिक गिळीले । चोर जाहले साव ॥

ठरवुन आम्हा हीन कलंकित । जन्मोजन्मी करूनी अंकित ।
जिणे लादुनी वर अवमानित । निर्मून हा भेदभाव ॥

एकजुटीच्या या रथावरती । आरूढ होऊन चल बा पुढती ।
नव महाराष्ट्रा निर्मून जगती । करी प्रकट निज नांव ॥

□□□

## नारायण सुर्वे

### सत्य

तुझे गरम ओठः ओठावर टेकलेस तेव्हा,
तेव्हाही रात्र अशीच होती; घुमी
पलीकडे खडखडणारे कारखाने
खोल्याखोल्यांतुन अंथरले बिछाने
मुल्लाचा अल्लासाठी अखेरचा गजर
काटे ओलांडित चालले प्रहर
भावंडांसह कोनाडा जवळ केला आईने
धुमसत, बिछान्यासह फुटपाथ गाठली बापाने.

तुझे गरम ओठः खडीसाखर होत गेले तेव्हा
तेव्हाही रात्र अशीच होती. ओढाळ
खपत होतो घरासाठीच—
विसावत होतो शीण तुझ्या काठावर
तुझ्या खांद्यावर-
तटतटलीस उरीपोटी
तनु मोहरली गोमटी
एक कौतुक धडपडत आले; घर भरले
हादरली चाळ टाळांनी, खेळेवाल्यांनी
वाकलीस खणानारळांनी

तुझे गरम ओठः अधिकच पेटत गेले तेव्हा
तेव्हाही अशीच एक रात्र आली, नकार घेऊन
पंखाखाली बसलीस चार पिले ठेवून
कोनाडा हळहळला - कळवळला
'नारायणा' - गदगदला
'शिंक्यावरची भाकर घे' - पुटपुटला
'उद्यापासून तिलाही काम बघ बाबा'
गांगरलो. भोवंडून स्थीर झालो
तिच्या ओठावर ओठ टेकवून
बिछान्यासह बाहेर पडलो, त्या रात्री,
तिचे ओठ अधिकच रसाळ वाटले, अधिकच— □□□

## तुमचंच नांव लिवा

मास्तर, लिवा-
तुमचंच नांव लिवा.
खरं सांगते; मरीआईला समरून सांगते,
लिवा तुमी-
ह्येच्या केसाची जटा बगा मास्तर;
कसा नागाचा फडा हाय त्यो_
अवं_ देवाचं देणं हाय त्ये_ देवाचं.
मास्तर, जिमीन उतमातती_
व्हय, उफानती, पर
नांगुर घातल्याबिना, आन
बी पेरल्याबिना,
रोप वर उगतं का ? उगतं ? बोला
मग बापाच्या जागी माजं नांव लिवून कसं जमंल
बाप न्हाई म्हनलं तर पोराचा म्होरला जलम कसा जळंल

कनच्याबी देवाचं नांव नगा लिवू
मानसाचंच लिवा_
देवानं काय केलंय हो,
वटी तेनंच ना भरली ही_
तुमचंच नांव लिवा.

जात नगा इच्चारू;
अवं, आमी कुना एकाची का बायली हावंत मास्तर,
घरोट्यातल्या बाया नव्हत आमी,
तेवढं कुठलं हो नशीबाला_

तेचा जलम हितलाच.
फाटंला जलामला त्यो; फाटंला
पॉट निरनाखाली सराकलं
ना सुईण, ना काय जवळ
आधी मन चराकलं_पन मग हराकलं

पड, पोरा
पड पाया
पड ह्येंच्या पाया
पर तेवढं तुमचंच नांव लिवा.

□□□

## दया पवार

### हे महाकवे

बा वाल्मिकी
रामराज्याची तू स्तूती गावी
कारण तू कवींचा महाकवी ?
क्रौंच पक्षाची हत्या पाहून
तुझे कारूणिक मन आक्रंदून उठले
तुझा जन्म झाला गावाबाहेर
उपेक्षित वस्तीत जिथे दु:खच जन्मले
तिथले विषण्ण चेहरे काळजीने नांगरलेले
फळाफुलांनी नाही कधी बहरले
मुक्तीसाठी त्यांनी टाहो फोडलेले
खरंच का न ऐकले ?
तुझ्याच रक्ताचा एखादा शंबूक
तटतटून संतापाने पेटून उठला
रामराज्याची स्तूती गाणाऱ्या
हे महाकवे...
तिथेही अमानुषतेचा हिमकडा कोसळला

हे महाकवे
तुला महाकवी तरी कसे म्हणावे ?
हा अन्याय अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी तू श्लोक रचला असतास...
...तर तुझे नांव काळजावर कोरून ठेवले असते.

□□□

## कोंडा

कोंडा
तसे तुझे जुने खोड,डपल्या-डपल्याचे
वय उतरणीचे,कधीतरी कोसळणारे
ते आज अचानक मुळासकट कोसळले

डोक्याला कफन बांधून
तू काळाराम सत्याग्रहात लढलेला
एखाद्या तीरासारखा मैदानात उ़तरलेला.

तुझ्या रूपाने वस्तीला इतिहास आठवला
बुध्दम् सरणम् गच्छामि या गजरात
तुझ्या निर्वाणाचा रथ सजला.
-तसा वस्तीचा हा गुण चांगला
तोरणादारी का मरणादारी
हे असे उत्साहाने ओघळतील.
बाकी जिंदगीभर,
एकमेकांवर काठ्या घालतील.

आजही तसेच झाले
झाडून साऱ्यांनी खाडा केला
जो तो दु:खाने गहिवरलेला
गटागटाने अंतयात्रेत मिसळलेला.

मी सहजच तुझ्याकडे पाहिले,
वर्गणी जमवून आणलेली
फुलाफुलांची नक्षीदार चादर पांघरलेली
उन्हाची तिरीप झेलीत कुणीतरी
तुझ्यावर छत्री धरलेली

का कुणास ठाऊक
करड्या मिशीतून तू हासलास
नेहमीसारखा टाळी द्यायचास
पण रस्सीने चांगलाच जखडलास.

अंतयात्रा हमरस्त्यावर येता
वरल्या आळीने उघडल्या खिडक्या दारे
'अहो,पाहिलंत का

रेशनच्या गोण्या वाहणारा
बिचारा कोंडा मेला'

'मम्मी, तोच ना ग हा
पाणी वरून वाढायची याला
ओंजळीने कसा घटाघटा प्यायचा'

'चल, आत हो-तोंड पाहू नये'
पटापट बंद झाली खिडक्या दारे

जथा जसा स्मशानाकडे सरकला
पुन्हा बुध्दम् सरणम् चा गजर घुमला.

आता स्मशानात भाषणाची चढाओढ लागलेली
'कोंडा आमच्या जिल्ह्यातला' जिभेला रसवंती फुटलेली

भाषणाच्या चक्री वादळात तू चांगलाच भोवंडलेला
म्हणतोस 'पोरा-जरा जाऊन शेकतो, आयुष्यभर गारठलेला'
असे म्हणून तरातरा पेटत्या सरणाकडे चालू लागलेला

भाषणांची तबकडी चालूच 'कोंडा किती किती महान
काळाराम सत्याग्रहात लढलेला'

□□□

## केशव मेश्राम

### आमच्या वस्तीत

आमच्या वस्तीत भांबावतो पोष्टमन,
गोंधळतात संस्कार, अडखळते सभ्यता
अंधारतो सूर्यही, चिखलात उठावेत
गुरांच्या खुरांचे ठसे, तशी ठसठसती
आमची घरे— त्यातच असते प्रवाहोत्सुक मन

आमची वस्ती गाजता, गरजता फेसाळता
बेफाम समुद्र काळ्या लाटांलाटांचा,
साच्यात काचणारी, मातीत मुरणारी
इथली माणसे, मुलायम कापसाची कावड वेचणारे
अशक्त राठ हात, विळ्यासोबत नाचणाऱ्या बांगड्या,
पोरे इथली घामाझोकळ रणरणत्या उन्हात,
उघड्या ट्रकमध्ये, फुगऱ्या नसांची, मिटल्या डोळ्यांची
वस्ती आमची दारूच्या घोटात, तिखट नळ्यांच्या
ताटात रंगणारी, महिनाभर राबूनही अर्धपोट जगणारी
मेणबत्तीच्या संबुध्द प्रकाशात भविष्ये न्याहाळणारी. नवनव्या दिसांची
लागताच पोष्टमनची चाहूल खळखळते वस्ती आमची.

गिचमीडीतून उठलेली पेन्सिलीची जांभळी अक्षरे
कुणाच्या जिभेवरली ओलसर मेंदी झिरपली असेल !
'राजू नरायेण' शोधशोधून पोस्टमन हैराणः
नंग्या मार्गदर्शकांची भिरभिर गर्दी,
नडगी शेकलेल्या विव्हळणाऱ्या मुक्यासारखा
भटकतोय पोस्टमन, वाकून दलदल चिखलातून,
भोंगळ कपड्यात घाम निथळतो, पायपीट सरते,
'खेडेवाल्या बुडगीचं सोनं, झाल्याची घार
झेपावत, नखे रोखून वस्ती पंखाखाली घेते.

भांबावतात सुधारणा आमच्या वस्तीत,
ठेचाळतात रस्ते, योजनाही अडखळतात,
आता आत्ताशा थोडे वाचतात 'मुलगे' लिहितात
कथाकविताः शब्दांच्या कुऱ्हाडी कोसळतात

जूनजुनाट झाडांवर, साहित्याच्या स्वप्नावर बरसतात
अनोख्या वास्तवाच्या गरम अनुभवी गारा,
पुन्हा होतात सुरू, पोलिस पोस्टमेनच्या येरझारा
काळोख खदखदतोय उभा सूर्य पचवून,
आमच्या वस्तीत भांबावतो पोस्टमन अजून

□□□

## एक दिवस मी परमेश्वराला

एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली:
तो लेकाचा फक्त फक्कन हसला,
शेजारचा जन्मजात बोरूबहाद्दर उगीचच हिरमुसला,
एरंडेली चेहरा करून मला म्हणाला :
"तू असा रे कसा, त्या निर्गुण निराकार
अनाथ जगन्नाथाला काहीतरीच बोलतोस ?
शब्दांच्या फासात त्याचा धर्मफणा धरतोस ?"

पुन्हा एकदा मी कचकून शिवी दिली,
विद्यापीठाची इमारत कमरेपर्यंत खचली,
माणसाला राग का येतो या विषयावर
आता तेथे संशोधन सुरू आहे,
उदबत्तीच्या घमघमाटात भरल्या पोटाने
भावविव्हळ चर्चा झाली,
माझ्या वाढदिवशी मी परमेश्वराला शिवी दिली.

शिवी दिली, शिव्या दिल्या, लाटांसारखे
शब्दांचे फटकारे मारीत मी म्हटले,
'साल्या ! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय ?
चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजलेले हाडके शरीर पुसशील काय ?
बापाच्या विडीकाडीसाठी
भावाबहिणींची हाडके झिजवशील ?
त्याच्या दारूच्या घोटासाठी भडवेगिरी करशील ?

बाप्पा रे, देवबाप्पा रे ! तुला हे जमणारच नाही,
त्यासाठी पाहिजे अपमानित
मातीत राबणारी,
प्रेम करणारी मायमाऊली —'
एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली.

□□□

## यशवंत मनोहर

---

### वैरी

ते ग्रीष्म माझे वैरी आहेत
ज्यांनी इथे प्रमाणिकपणा रूजू दिला नाही
ते आहेत आपमतलबी बगलबच्चे
ज्यांनी सत्याचा जन्म उजेडात येऊ दिला नाही
सैतान असली ते आहेत
ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकूस घडवले
कपटी चांडाळ ते आहेत
ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडवले
ज्या नियमांनी सृष्टीचा हा विद्रूप विकास सिध्द झाला
त्यांचा मी जळजळीत निषेध करतो
ज्यांनी इथल्या सूर्याला दगडांनाही
ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले
संचित निश्चित केले
त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो
ते सर्व देव दैववादी माझे वैरी आहेत
ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली तिची मधुर ओवी केली
ते शब्दप्रामाण्यवादी सगुण निर्गुण वैरी आहेत माझे
ज्यांनी मला आजवर मुक्त होऊ दिले नाही.

□□□

### कालचा पाऊस

कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे
कालपर्यंत पावलांनी रस्त्यांपाशी तक्रारी मांडल्या नाहीत
झाडे करपली. माथी हरपली.
नदीच्या काठाने मरण शोधित फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो
कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही.

□□□

## नामदेव ढसाळ

### आंबेडकर : १९८०

तू मेलास, म्हंजे संपला नाहीस.
आमच्या सारखाच तुही झोपलास बायकोबरोबर
पोरं काढलीस. पण वाऱ्यावर सोडली नाहीस
आम्ही वाढलो असे, तसे, कसेही
परंतु आमच्या मुलांना
तुझी माया डावलण्याची हिंमतच होणार नाही कधी
ॲकॅडॅमिशयन । टेक्नीशियन । पॉलिटिशन । सायंटिस्ट
फिलॉसॉफर
हे काहीही लावतील तुझा अन्वयार्थ
तू जगलास फक्त माणसासारखं
ना त्याच्यात नाटक होतं
ना नाट्याविष्कार
ना नक्कल, ना नकलाकार

आता हे सर्व जुनं झालंय,
की त्यांनी आम्हाला वरून पाणी वाढलं
आता हे सर्व जुनं झालंय
की त्यांनी शाळेच्या पडवीबाहेर आम्हांला बसवलं
आता हे जुनं झालंय
की त्यांनी विठोबाचे काळेपांढरे पाय
आम्हाल पाहू दिले नाहीत
आता ते आणि आम्ही सगळेच सारखेवारखे
या जगातला समाजवाद
या जगातला कम्युनिझम
आणि तुझंही सर्वकाही
आम्ही लावलं आहे कसाला
त्यातनं झालं हे ध्वनित
आपलीच सावली आपल्या पायांना झाकू शकते

२

तुलाही शिव्या देतो परंतु
जीभ तूच दिलीस
तुलाही पाण्यात बुडवतो, परंतु
पाणी तुच दिलेस
तुझे काहीही केले, तरीही
तुझे काहीही करता येते
परंतु प्रश्न राहतो माझ्या इमानाचा
प्रामाणिकपणाचा
तू कोण आहेस ?
तू कोण होतास ?
तू कुणाचा आहेस ?

३

जमाना सर्व तुझाच आहे
तरीही तुझे लोक दु:खी आहेत
फकिराला पंतप्रधान होता येतं इथं
परंचु मांगा - भंग्याला नाही.
खुर्चीपुढे संसदेची किंमत झाली आहे कमी
क़ायद्यापुढे रंडिची किंमत झाली आहे कमी
या सर्वामध्ये एकच पाहिले
की तुझे ऋतुचक्र सर्वांवर बरसले सारखे
कुठेही झाला नाही तुझ्याकडून पंक्तीप्रपंच

४

शुक्रवारचा दिवस होता
उजळणीचं पुस्तक एक स्लेट
आणि दगडी पेन्सिल
आईनं हौसेनं आणली बाजारातून

त्या दिवशी ती फारच थकली होती
चिमणीच्या उजेडात
तिने चेपून घेतले हातपाय माझ्याकडून.
नंतर ती म्हणाली,

'बाबा– मला डुलकी लागेपर्यंत
पाहून घे हे बुक
मी नाही शिकली सवरलेली
पण एक कर
शिक्शनाची सुरुवात
बा म्हणजे बाबासाहेबापास्नं कर
गणपतीपेक्षा ते लईच सुंदर होते.
म्हणून नको गिरवूस
श्रीगणेशा
गणांचा पती नस्तो कुरूप
तो असतो माणसातला
सत्यम । शिवम् । सुंदरम्
सत्यम शिवम् सुंदराला
म्हणतात बाबसाहेब आंबेडकर
बाकी या बुकाला काय बी आरथ नाही बघ

५

हे सर्व लिहीपर्यंत रात्रीचे
तीन वाजलेयत
दारू पिण्याची इच्छा असूनदेखील
दारू पिऊशी वाटत नाहीय.
फक्त झोपावेसे वाटते शांत
उद्याची वर्णहीन सकाळ पाहाण्यासाठी

□ □ □

# अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा

अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा
शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाड्यात
किती दिवस रहायचं आम्ही ?
श्वास घुसमटत !
-न-नष्टचर्येच्या गटारात
सडत होतो आम्ही अगतिक किड्यासारखे
आजपर्यंत-
लक्तरांत गुंडाळलेली आमुची अब्रू
गोलपिठ्यावर नागविणारांनो-
-तुमचा ऱ्हास जवळ आलाय:
मुक्तछंदाच्या संजिवनीने
आम्ही जिवंत झालो आहोत-
-तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी !
-शब्द म्हणाले
अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा

□□□

# हिरा बनसोडे

## सखी

सखी,
आज प्रथमच तू माझ्याकडे जेवायला आलीस,
नुसतीच आली नाहीस तर तुझी जात विसरून आलीस.
सहसा बायका परंपरेची विषमता विसरत नाहीत
परंतु तू आभाळाचे मन घेऊन आलीस.
माझ्या वीतभर झोपडीत,
वाटलं,जातीयतेचा तू कंठच छेदला आहेस,
माणसाला दुभंगणाऱ्या दऱ्या तू जोडीत आली आहेस.

खरंच सखे,फार फार आनंदले मी,
शबरीच्या भोळ्या भक्तीनेच मी तुझं ताट सजविलं
किती धन्य वाटलं मला !
पण-पण ताट बघताच तुझा चेहरा वेडावाकडा झाला,
कुत्सित हसून तू म्हणालीस,
"इश्य ! चटण्या,कोशिंबिरी अशा वाढतात का ?
अजून पान वाढायलाही तुला येत नाही !"
खरंच,तुमची जात कधीच सुधारणार नाही !"

माझा जीव शरमून गेला-
मघाशी आभाळाला टेकलेले माझे हात
चटकन कुणीतरी छाटल्यासारखे वाटले,
मी गप्प झाले.

जेवण संपता संपता तू मला पुन्हा विचारलेस,
"हे ग काय ? मागच्या भातावर दही,ताक काहीच कसं नाही ?
बाई ग,त्याशिवाय आमचं नाही हो चालत-?"
माझं उरलंसुरलं अवसानही गळालं
तुटलेल्या उल्केसारखं,
मन खिन्न झालं,सुन्न झालं पण-
पण दुसऱ्याच क्षणी मन पुन्हा उसळून आलं
पाण्यात दगड मारल्यावर जसा तळाचा गाळ वर येतो,
तसं सारं पूर्वायुष्य हिंदकळून समोर आलं,

सखे,दही-ताकाचं विचारतेस मला !
-कसं ग सांगू तुला ?
अग,लहानपणी आम्हाला चहालासुध्दा दूध मिळत नव्हतं,
तिथं कुठलं दही आणि कुठलं ताक ?
लाकडांच्या वखारीतून आणलेल्या टोपलीभर भुश्यावर-
माझी आई डोळ्यांतला धूर सारीत स्वैंपाक करायची
मक्याच्या भाकरीवर लसणाची चटणी असायची कधीमधी,
नाहीतर भाकरी कालवणाच्या पाण्यात चुरून खायचो आम्ही,
सखी,श्रीखंड हा शब्द आमच्या डिक्शनरीत नव्हता तेव्हा,
लोणकढी तुपाचा सुगंध घेतला नव्हता माझ्या नाकाने,
हलवा,बासुंदी चाखली नव्हती कधी या जिभेने,
सखी,तुझी परंपरा तू सोडली नाहीस
तर तिची घट्ट मुळे तुझ्या मनात रुजलेलीच आहेत
हेच त्रिवार सत्य आहे.

मैत्रिणी,मागच्या भातावर दही नाही
म्हणून रागावू नकोस ग...!
तुला वाढलेल्या ताटात आज पदार्थाचा क्रम चुकला
यात माझा काय दोष हे मला सांगशील का ?
माझा काय दोष हे मला सांगशील का ?

□□□

# वामन निंबाळकर

## माय

जसा दिवस डुबून जाई काळोखाचे राज्य असे
आम्ही बसू दरवाज्यात झोपडीत साधा दिवा नसे

घरोघरी दिवे लागत चुलीलाही जाळ लागे
भाकरी जात बडविल्या कुठे चून कुठे वांगे

नाकात जाई वास त्याचा पोटात असे अंधार सारा
तसे येई भडभडून आसवांच्या डोळ्यात धारा

अंधाराला चिरत तेव्हा एक सावली जड येई
डोई तिच्या भारा असे चालताना तोल जाई

काळी,काळी,कृश देह ती असे माझी माय
वणवण सकाळपासून मोळीसाठी रानात जाय

वाट पहात बसू कधी तिची सारे आम्ही भाऊ
मोळी नसे विकत तेव्हा भुकेलेले झोपी जाऊ

एकदा काय कसे झाले आम्हा काही कळले नाही
माय आली पाय बांधून भळाभळा रक्त वाही

चावला साप मोठा काळा दोन बाया होत्या सांगत
फणा काढून मारला त्याने हळूच गेला निघून रांगत

माय पडली धरणीवर गंडे झाले,मंत्र झाले वैद आला
दिवस निघता,निघता तिच्या देहातून प्राण गेला

हंबरडा फोडला आम्ही तो विरला वाऱ्यावर
माय तरी सोडून गेली चिल्लेपिल्ले वाऱ्यावर

शोधते माझी नजर माय,आता मी उदास होतो
दिसता कृश मोळीवाली मोळी तिची विकत घेतो

□□□

# अर्जुन डांगळे

## बलुतेदार

लाख नाकारीत असाल
नाकारा
तुमच्यापैकी कित्येक मनांच्या कंगोऱ्यात
अजून आहे दडवलेला
इंचभर तरी 'पुरीचा शंकराचार्य'
येतो उफाळून कधी कधी तो वर
द्वेषाच्या अग्नीने
'दिवाळीतला साप' जसा व्यक्त होतो विराट रूपात
लहान मुलाने लावलेल्या पेटत्या काडीने
लाख नाकारीत असाल
नाकारा
आम्हाला त्याचे काहीच नाही
नाही उठत आता पेटून भुकेला आत्मा
कारण तोही खूब समजून चुकलाय्
नागडे मन तुमच्या जवळ नाहीच नाही.

लाख नाकारीत असाल
नाकारा
आम्हाला काहीच बोलायचं नाही
आमच्या व्यथांचा जथा
येत आहे खडक ओलांडून - सपाट मैदानावर
ओठात ओवून नकार
डोळ्यात त्याच्या आहे अंगार
येणार आहे, येतो आहे
आमच्या व्यथांच्या जथा सपाट मैदानावर
अन् देणार आहे, देणार आहे
टक्कर या संस्कृतीच्या जुनाट बुरूजावर
कदाचित नाही पडणार खिंडार
होईल रक्तबंबाळ, राहील फक्त वेदनाच माथी
सज्जन हो, फिकीर नाही आम्हाला त्याची
जगू शकतो घेऊन हा वेदनांचा भार
कारण आम्ही युगानुयुगाचे दुःखाचे बलुतेदार.

□□□

## युगाच्या इतिहासा साठी

नसेल सापडत त्यांना माझ्या गाण्यात
त्यांच्याच भाषेत सांगायचे तर
गोळीबंद अनुभवाचा कलात्मक अविष्कार
नसेलही संबंध माझ्या गाण्याचा त्यांच्या मते
कलाकृतीच्या घाटाशी, त्यांनी ठरविलेल्या आकृतीबंधाशी
नसेलही जोडीत नाते माझे गाणे—हेही त्यांच्याच मते
अमूर्त प्रगल्भ चिंतनशीलतेशी
पर्यायाने———
मला नक्की सांगता येणार नाही कशाशी
त्यांचे असो—तसे त्यांना काहीच देणे घेणे नसते
आपण आपले गाणे गात रहाणार
त्यांचे काय
ते जगत असतात
साहित्याचा इतिहास घडविण्यासाठी
आपण जगतो आहोत
युगाचा इतिहास घडविण्यासाठी.

□□□



124277

## प्रल्हाद चेंदवणकर

### ऑडिट

तुमच्या पावलांखाली
दडपलेले आमचे श्वास
अजूनही घुसमटताहेत
गावाबाहेर उकिरड्यात
'देणे' तरी तुमचे किती
दाखवा आम्हाला हिसाब किताब
इतिहासाचे वारसदार
विचारतो आहोत, द्या जबाब !

महात्मा फुले - आंबेडकरांनी
तुमचे अकाउन्टस ऑडिट केलेत;
ग्रंथाग्रंथांच्या पानांवरचे फ्रॉडस्
सगळे डिटेक्ट केलेत;
जर्नल एन्ट्रीज किती करायच्या
ऑडिट रिपोर्ट सादर केलेत
तुमचे मात्र तेच रडे
जानवं पांघरून पेडगावकडे;

गतजन्मांचे कुजके स्टँप्स्
कधीच आऊटडेटेड झालेत
तुमच्या कपाळावरचे गंध
त्या आधीच बायकॉट झालेत;

अजूनही संधी आहे
चूक भूल विसरून जाऊ
तुमच्या पापांची एक्सेस बॅलन्स
रिटन-ऑफ करून घेऊ;

तुम्ही फक्त एवढंच करा
माणसांसारखे वागत चला
तेही जमलं नाहीच तर
दिवाळखोरी जाहीर करा.

□□□

# माधव कोंडविलकर

## वाढत होतो

माझ्या काटल्या आहेत वाटा उदरातच असताना आईच्या
पदराखाली घेताना आपल्या म्हणायची, 'बाबा आपुन
तुकड्यावर पोसलो त्यांच्या
गावकीची सेवा करावी, ते म्हंतील तसं वगावं
उचलून बोला नये कोणास सगल्यास्नी बावापुता करावं,'

माय म्हणायची, 'त्येनीच देलानी ना हा थारा-नायतर
वाजलं आस्तं आप्लं बारा,
आपुन पन तसा करूस हवा जग हाय फक्त हसनारा
दुनिया आसुन करूचिय काय हातपाय हालवलं तरच
कोनपन देतात
रडणाराचं कोन नाय हसल्या गालाचं मुकं घेतात'

माय म्हणायची, 'दिवस आमी मरान काडलं-अरेला
कारे म्हटला नाय-
असाच वागसील वाकान जासील तुज्यावर आमचा
इस्वास हाय
बावा सिल्या तुकड्याचे आपुन धनी
दारात जावचा मागान खावचा करूचाय काय
आप्नास आनी.'

असा आप्ला वाढत होतो-उकिरड्यावर वाढतात
जशी डुकरं.
भयाण अंधारात मायच्या कुशीत शिरत होतो
पांघरूण बोंदर

आणि कधीतरी असंच शाळेच्या पटावर चुकून नांव पडलं
तेव्हा झाला एकच कल्लोळ, साऱ्या जिभा वळवळल्या
म्हणाल्या, 'आमची शाळा बाटवलं'
आणि शाळेने कोपरा उदारतेने बहाल केला
तेव्हा शिळा तुकडा घशाला अडकावा तसा एक काटा
खोल कुठेतरी रूतून बसला.

वह्यापुस्तकांचा पत्ता नव्हता, हातात एक फुटकी पाटी
आणि दगडी पेन्सिलीचा तुकडा
कुणीतरी दिलेला शाळेपुरता एक फाटका सदरा, बाकी
दिवसभर उघडा.
दोस्त नव्हते कोणी, दुरून सारे चालत
'आपाडलास तर मार खाशील !' अशी होती हालत.

दोस्तांनो, चामड्यांना चुना लावल्याने हातांना पडलेले
घट्टे आता साफ बुजले आहेत,
मात्र ह्रदयावरच्या खुणा भोवरी क़ापावी तशा कापल्या
तरी अजून वाढताहेत.

□□□

## ज्योती लांजेवार

### कशाला जन्माला आलास ?

कशाला जन्माला आलास ?
इथं या बकालवस्तीत
इथली सगळी झाडं छाटलेली आहेत !
आणि दिव्याच्या खांबांना
गंज लागला आहे__
सारे रस्ते कसे धूळ माखलेले
जागोजागी उभे झाडांचे बुंधे
हत्तीरोगाच्या पायासारखे
कशाला जन्माला आलास ?

इथे जाहिरातींचे टिनपत्रे किंवा
सिमेंटी स्तंभही तुझ्या निवाऱ्याला नाहीत.
इथे फुलांच्या ताटव्यांचे रान माजले
काटेरी-कुंपणाच्या तटबंदीत
किडी-मुंगळ्याचे खाद्य होत
फुलापानांचा ढीग पडला आहे
कशाला जन्माला आलास ?

इथले सारे मोची अनवाणी
दाढी-मिशांचे जंगल वाढविलेले न्हावी;
दातांच्या सेकंडहॅन्ड कवळ्या विकणारे
सारे दंतविहीन दन्तवैद्य;
इथे कात्र्यांनाही मोठा काटेकोरपणा आहे.
कशाला जन्माला आलास ?

हत्ती-घोडे आता रिटायर्ड झालेत इथे.
माणसांचा नवा भरणा सुरू आहे-
माणुसकीला ओढायसाठी,
सज्ज होऊन माणूसपागेत.
कशाला जन्माला आलास ?

□□□

## काळाची गरज

आई_तुझ्या गर्भात
रक्तरंजित लेकरू

थांब_! पायधूळ लावू दे
मला मस्तकी_

बाबा_तुझ्या ह्रदयात
सनातन्यांचे लेणे

थांब_उतरवू दे_मला
डोळ्यात माझ्या.

ताई_तुझे प्रेम हटव
भिजल्या गालावरून

मी आधीच भार वाहतोय
माझ्या आसवांचा.

दादा_तुझे हात हवेत
या थकलेल्या हातात

अन्यायाविरूध्द बंड
उभारण्यासाठी_

मुला, तू अजून निद्रिस्तच
ऊठ_सूर्य उगवला आहे_नव्या क्रांतीचा

मुली, तुझे प्रसाधन आटोप लवकर
पदर खोच कमरेला_दारापुढे मोर्चा आहे.

□□□

## ज. वि. पवार

### तुरूंगातली पाखरे

झिंदाबादचा मुर्दाबादचा जयघोष करत आगीचा लोळ आता पुढे येतोय्
अटकाव करू पहाणाऱ्या समुद्रातही वडवानल जन्म घेतोय्

आता अटकाव कसला : धमनीधमनीने ज्वालामुखी व्हायचे
इंचाइंचागणिक खंदक खणत जायचे

कारागृहाची भीती कुणाला ? उभं आयुष्य तुरुंग समजून सहनलं
हेही बरंच झालं : तुरुंगाच्या पायथ्याशी सुरुंग पेरणं शक्य झालं

किती जेल्स_किती बरॅक्स_याचा एकदा हिशेब करा
उधाणलेल्या समुद्राला बांधणार कसं याचं एकदा गणित मांडा.

समतेचं वारं प्यालेली_त्यांना असं डांबू नका
तुरुंगासह ती उडून जाणार नाहीतच अशा भ्रमात राहू नका.

□□□

# मल्लिका अमरशेख

## संभावित सूर्यासारखे

संभावित सूर्यासारखे तुम्ही नेहमीच निर्विकार असता
नित्यनेमाने पाठ फिरवून चालायला लागणारे.
तुमचे विचार मुरलेल्या लोणच्यासारखे बंद बरणीत.
सारं पंचतंत्र तोंडपाठ असतंय् तुम्हाला.
तुम्ही हुकुमाचे पत्ते हातात ठेवूनच नेहमी खेळता.

आमच्या आयुष्याच्या नाक्यानाक्यावर वासुगिरी करणारे
तुमचे लंपट शब्द,
आमच्या सगळ्या आयुष्याला फोरासरोड करणारी
तुमची चवचाल नाण्यांची रास,
तुमच्या घरांपुढं उच्च विचारांची रांगोळी असते;
रंगीत शोभिवंत ठिपक्याला ठिपके जोडून काढलेली.
काचेरी बिलोरी शोकेसमध्ये
तुम्ही ठेवता चमकदार सप्तमूल्ये.
सिग्रेट फुंकल्यासारखं तुम्ही बोलता
मानवतेच्या मूल्यांवर.

हरिण डोळ्यांनी बघत असलेलं आमचं आयुष्य
किती दिवस करायची साठमारी
अशी स्वतःच्याच रक्ताची ?
खरंच का उधाणत नाही कणाकणांतला द्वेषसंताप ?
प्रत्येक शहराच्या नाक्यावरून पाण्याऐवजी
का नाही कारंजी उडत फुत्कारण्याऱ्या रक्ताची ?
किती वेळ नुस्तं पहात राहणार
बळी चाललेल्या बोकडाचे डोळे ?
प्रत्येक जण थडगी फोडून बाहेर का निघत नाही ?

या वारुळत्या शहरात रक्ताळलेला गुलमोहर,
आणि गटाराच्या खिडकीत
वेश्या होऊन पडलेली पौर्णिमेची रात्र...

मला हे पहायचं नाहीय्
आणि मला हे संपवायचंय् सगळं...
असं डोळे मिटून काही होणाराय् का ?

इथल्या प्रत्येक लहान पोराच्या
डोळ्यात असणारं वठलेलं झाड
इथल्या प्रत्येक आईचा पदर
असंख्य जळवांनी भरलेला,
हे सगळं पहातां डोळे मेणाचे होतात
आणि मन होतं अश्वत्थाम्याची चिरंजीव वेदना.

□□□

## प्रकाश जाधव

# माणूस नामका धरम्

रात धुंड्या दीस धुंड्या
पर कोन आयताच गवश्या नय

पीर धुंड्या दरगा धुंड्या
पर होनी को किसने टाल्या नय

जुम्मेसे बैठ्या मह्यनेसे बैठ्या
पर हज का पानी आव्या नय

खुद को धुंड्या माळरान धुंड्या
कोन पाक नजर गवश्या नय

दिस भाय धुंड्या रात बेगम धुंड्या
पर माणूस नामका धरम गवशा नय

□□□

## मरण

आज संपू दे आहुतींचे सोवळे संदर्भ
आज विझू दे अध्यात्माचे सनातन यज्ञ
उद्या आणिक एक पाहीन
रक्ताचे नाते उध्वस्त होतांना
प्रथाच पडून गेलेय आता
सूर्याला नागडं करायची आणि उल्केचे कासोटे फेडायची
मलाही एक सवय जडलेय आताशः
दगड फेकून आकाश फाडायची
मेल्यागेल्याचं दुःख होतं. संताप येतो
पण रोटी शेकल्यावर विस्तव जळला काय नि विझला काय
सारखंच.
मारणाऱ्यांनी मारत रहावे
मरणाऱ्यांनी मरत रहावे
आया बहिणींची स्वस्त मरणे पहातां पहातां
लोकशाहीतील क्षुधित घुबडे
उद्या माझेही मरण घेऊन उभी असतील माझ्या बायको समोर
निर्वस्त्र.

□□□

# त्र्यंबक सपभाळे

## ...तर मी काय करू ?

आता रडू
कोणा कोणासाठी ?
आहेत कुठे
माझ्या डोळ्यांत अश्रू ?
कोरड्या पापणीतून निघतात
विद्रोहाच्या ठिणग्या
त्यांनी पेट घेतला तर मी काय करू ?
माझ्या जीवनाच्या
बंद केल्या तू सर्व वाटा
उडी घेताना
मृत्यूच्या कड्यावरून
तुझ्या मानेवर,
माझे दात तुझ्या गळ्याला लागले तर मी काय करू ?

चिपाडागत
झाला माझा देह या हिंदवी संस्कृतीच्या गुऱ्हाळात
माझ्या रसावर तरारलेल्या लतावेली
सावलीला यायची
मलाच करती बंदी
या चिपाड देहाने
पेट घेताच,
सुक्याबरोबर ओले जळू लागले तर मी काय करू ?

कंबर झाकावी असे काय उरले आहे ?
चिरगुटं तरी
कुठं ठेवली आहेत ?
स्वातंत्र्याच्या पाव शतकात
सगळ्यांनाच मिळाले स्वातंत्र्य
ते ओढून नेण्याचे
असा मी दिगंबर
त्या आदिमायेच्या मागे धावताना

'नंगे से खुदा डरे' ठरलो तर मी काय करू ?

माझे पोटच झाले कब्रस्तान
प्रत्येक धर्माचे धर्मग्रंथ
घेत आहेत चिरशांती
माझ्या पोटाच्या कक्षा
वाढत वाढत जाऊन
त्यात धरती सामावू लागली तर मी काय करू ?

नाळ तोडल्यावर
तू आपल्या जीवन प्रवाहातून मुक्त केले
हे भारतमाते ! त्वां मला प्रेम-वात्सल्य केव्हा दिले ?
या कालप्रवाहात मी कर्ण न होता
ईडीपस होऊन तुझ्या शय्येवर आलो तर मी काय करू ?

□□□

## बा. स. हाटे

### फाटलेली जिंदगी

फक्त फाटलेली जिंदगी शिवून द्या बाईसाहेब,
मी कदीबी साळंत गेली न्हाय
_पन शिक्षान म्हणजे वाघिणीचं दूध हाय
ज्याला मिळल ते डरकाळल्याशिवाय राह्यचं नाय
असं म्हनाला हुता बाबासाहेब-
कंच्यातरी शाळंला त्याचं नाव देऊ नये म्हून
एवढा त्येगा झाला- गाव न गाव पेटला
माजं बी घर जळीत झालं, याचं काय नाय
घर काय आजचं उद्या उभं राहातं.
फक्त फाटलेली जिंदगी शिवून द्या बाईसाहेब.

घराचा धूर आभाळात गिरक्या घेतोय,
मेलेल्या पोराचा हुंदका गळ्यात अडकतोय,
जळलेल्या दाण्यांचा ठसका बसतोय
दुसऱ्याचा कळवळा काळजात थरकतोय
उन्हात जिवाचा काहिलीसारा भडका होतोय
ह्ये एवढं आभाळ कोसळलं
जगण्यासारखं तरी काय उरलं ?

राखंच्या ढिगाऱ्यावर बसून ऱ्हायलो_
घरादारावर नांगर फिरला,
दोन दिवस पाण्याबिगर गेले,
आंब्याच्या झाडाखाली
बापुडवाणं पडून राह्यलोय.
बेहोशीच्या अंधारात मेलो
_मांडीवर गिधाडानं चोच मारली
तवाच सुधीवर आलो.
भर दुपारी टारून फाटलो मरन्याचं दुःख नाय
फक्त फाटलेली जिंदगी शिवून द्या बाईसाहेब.

□□□

# भगवान भोईर

## उन्हातलं झाड

कोंबडा आरवला, नि
बाने फळी मांडली,
रापीला धार लावली निसण्यावर
कुंडावर गेला
चामडं साफ केलं.

च्या प्याल्यावर
पुन्हा फळी मांडली,
चामडं घेतलं; कापलं.
पाटलाच्या पोराचं लगीन,
नक्षीबाज जोडा बनवायला घेतला.
बाने अकराच्या आत
पालिसबिलिस लावून
चमकावून जोडा बनवला.
बच्यापाशी दिला.

मटणाची पंगत मिळंल म्हणून
बाच्या पाठीपाठी मी निघालो.
आग्नीचे दिस ते_
सूर्यबाप्पा सकाळपास्नंच आग ओकायचा
रस्त्याची धूळ लय गरम झालेली
नुस्ती कुत्र्यावानी चावा घ्यायची.

मी म्हटलं,
"ब, पाय लय लासत्यात ग,'
ब म्हणाली
"पलसाच्या पानांचा बूट बनव,"
मी म्हटलं,
"काय ग ब, आपुन दुसऱ्यांना पायताण देणार
पर आपलेच पाय उघडे बोडके."

ब माझी लय शानी
म्हणते कशी,
"झाडांनी सवता तापायचं उन्हात
पर दुसऱ्यांना, सावली द्यायची !
आपुन म्हंजे झाडच की,
सदाचं उन्हात असलेलं !!

□□□

# भुजंग मेश्राम

## बजारहाट

बजाराबद्दल तू आसी विच्यारते ये माय
जस कही तुह आताच झालं लगीन
न् ठावुक नोसाव बजारभाव
साइटवर बी तू लय पुस्ते माय खोदू खोदू
बजारात बायाच काहून जातेत ?
बजार कराले काय टोकलीच फायजे ?
खरं सांगु, माह्या सर्क्या रांडवला बजारसाटी
कोण हाये ? पोरालो आणाव मन्लं
बजार दाक्वासाटी, तू असी कोन्ची मजूरी ?

भरोशाच्या म्हसीने हाल्या द्यावं तसा,
हरेक हाट फुस्काच निंगतो मह्यासटी
जास्त काय गुळ, मिर्ची, भातका, पत्ती
पोरासाटी पाटी लेक्नी
ज्यासाटी गेला आसलं दोन मयनाचा औधी
पोराले आणाव वाट्टे सम्दं
पर यकेक बटवडा अन्नाच जाते खाली
अस्या टेमाली हाटाले जातानी
रुसणाऱ्या पोराले घरात कोंडा लाग्ते आंदी.

बजार, आये बजार मंजी
भरल्या चंचीन जे वाट्टे फाव, ते बजार
आता तू मन्शीन
मंग एवढ्या बाया काहून जातेत
ज्यैच्या पोटात पाण्यासिवा काई नस्ते आदार
माय, गोस्टी बी लय महागल्या आता
'दिवाळीतले पिक आन् सिमग्याले भिक'
आता दररोज सांच्याला
चरून आल्या गाईवानी फिरून येते फिकीर
कोणाकोणापुडी उघडं करावं व काळीज ?

जी भेटली ती अस्सी बोलते
जसं पेरणी झाल्यावर सुचावं उदिम
लय झोका वाट्टे की, अस्यायची कराव धुम्मस
किती बी चोपाव मन्लं सबुद
मातर माहं असं की, दुसऱ्याला नै दुकवू
आगर घेऊ नै दुकवाचा चानस

बाया मंतेत तू पोराले साइटवर काहून नै आणत ?
मी काई मन्लं तू अस्सं होत तोंड वाकडं
कडूझक आवशद घेवावं जस,
तवा त्यैचे कान नस्तेत आयकाला काहीयक
'मी मने नाई खात
मन महे महा त्याग
भरडले जवा चणे
तू अकेका फोलात दोन दोन दाणे'
त्यैला वाट्टे मी हाव खालमान्या गाईवानी :
कोन्चया भापेत सांगाव त्यैला
की, मझ्या लेंकाजवळ लेक्नी सिवा
आता काईच देआचं नही.

तू मंते, बजारातून काईच आणत नै पोरासाटी ?
माय, बजार मंजी महया सपनांची पात
आन् पोर्ग ? - अखीर लेकराचीच जात
कवा कोन्ची गोस्ट आवडल त्येले
सांगता येवाचं नही
तुला ठावूक आसलं, बजारामंदी
दगडाच्या जात्यापासून सेंदरापावतोर आजकाल
लय विकरा हाय.
पोराले आता तू फुटू लागले विखाते दात
आन दिसू लागली पैदलवाट
मी या रस्त्यांना काहून विकावं त्येचे पाय

पर्वा पडलं सपन. सपनात व्हती मही पुटपुट.
आता घालू मनीन पोराची समजूत
तू पोर्ग मनील, आता घरात कोंडून राहणार नै
बजार दाकव नै तू पाटी घे !
आन खरं सांगू ? पोराले आज दाकवला बजार
कोसाकोसावर्चे दगड_जादुगारापुडचा जुलूस_
बटवड्याची कापणी_ गर्दीचं अंधारहिव_
जिती साप्नं बी जळू लाग्तेत भुरूभुरू-
पोराले दिली घेऊन्न काळ्या रेघांयची वही
आन् माइच बा, बजारावरचं त्येनं लेहणं केलं सुरु

_आता कोन्ता धडा पोराले सिकवू !

□□□

## जांगड

त्यांच्या धर्मपीठात गेल्यावर
एक म्हणाला,
'हामी यादव कुळातले'
दुसरा बोलला,
'हामी सेटल झालेले भटके'
तिसरा रडला,
'ढालिया हाव म्हणून काय झाले ?'
चौथा हसला,
'हामी अंधारातले लंबाडे'
हे सर्व शांतपणे ऐकल्यावर
'तरीपण तुम्ही जांगड कसे रे ?'
ते सर्वजण बघू लागले एकमेकांकडे:
तर दिसलेत निव्वळ हडप्पाचे सांगाडे.

उत्तराच्या शोधात ते शिरले म्यूझिअममध्ये
म्हणतात, तिथून ते परत नाही आले–

□□□

# कवि परिचय

## कुसुमाग्रज - वि. वा. शिरवाडकर

*'कुसुमाग्रज' ह्या नांवाने काव्यलेखन व इतर लेखन श्री. वि. वा. शिरवाडकर ह्या नांवाने. गेली साठ वर्षे सातत्याने पूर्ण वेळ लेखनात मग्न. 'विशाखा' हा पहिला कवितासंग्रह. अनेक काव्यसंग्रह प्रकाशित. 'नटसम्राट' ह्या नाटकास साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला असून 'ज्ञानपीठ' पुरस्काराने त्यांच्या एकूण साहित्याचा गौरव करण्यात आला आहे.*

*जन्म : १९१२*

## अण्णा भाऊ साठे

*सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्म. प्रख्यात कादंबरीकार, कथाकार, लोकशाहीर म्हणून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात व जनचळवळीत आघाडीवर. यांची कित्येक गीते, पोवाडे व तमाशे आहेत. 'लोकनाट्य' चळवळीचे प्रमुख आधारस्तंभ. यांच्या अनेक कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत. पहिल्या दलित साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष.*

*जन्म : १ ऑगस्ट १९२०   मृत्यू : १८ जुलै १९६९*

## नारायण सुर्वे

*यांचे संपूर्ण नांव नारायण गंगाराम सुर्वे. लहानपणापासून अत्यंत खडतर अनुभव घेतले. 'ऐसा गा मी ब्रह्म !', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा', 'सनद' ही गाजलेली पुस्तके, महाराष्ट्र सरकारची पारितोषिके, त्याचप्रमाणे सोव्हियत लँड नेहरू पारितोषिक व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे पारितोषिकही मिळाले. रशियाचा दोनदा प्रवास. लोकवाङ्मय प्रकाशनगृह या संस्थेच्या ललितसाहित्य विभागचे सल्लागार. अत्यंत प्रभावी काव्यवाचन करणारे म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत.*

*जन्म : १५/१०/१९२६*

## दया पवार

*यांचे संपूर्ण नांव दगडू मारूती पवार. आरंभीच्या काळात परळच्या पशुवैद्यक महाविद्यालयात प्रयोगशाळेत साहाय्यक-कारकुनाचे काम त्यांनी केले. पश्चिम रेल्वेच्या कार्यालयातून ऑडिटर म्हणून नोकरीतून निवृत्त !'कोंडवाडा' हा त्यांचा प्रसिध्द कवितासंग्रह. १९७४-७५ चे महाराष्ट्र शासनाचे प्रथम प्रकाशन पारितोषिक त्याला लाभले. 'बलुतं' हे*

अत्यंत गाजलेले आत्मचरित्र, त्यांना फोर्ड फाऊंडेशन' शिष्यवृत्ती मिळाली. 'बलुतं' पुस्तकावरच 'बलात्कार' हा बोलपटही निघाला. 'विटाळ' हा कथासंग्रह, 'चावडी' हे मिष्कील व अंतर्मुख करणाऱ्या चटकदार ललितगप्पांचे पुस्तक प्रसिध्द झाले आहे. ते 'पद्मश्री' ही आहेत.

जन्म : १५ सप्टेंबर १९३५

## केशव मेश्राम

पूर्ण नांव केशव तानाजी मेश्राम. अकोला आणि मुंबई शहरात शिक्षण पूर्ण केले. सहा वर्षे पश्चिम रेल्वेच्या कार्यालयात कारकुनी केली. दोन वर्षे महाडला आंबेडकर महाविद्यालयात व १९६५ पासून महर्षी दयानंद कॉलेज येथे मराठीचे प्राध्यापक, सध्या विभागप्रमुख आहेत. 'उत्खनन', 'जुगलबंदी' व 'अकस्मात' हे कवितासंग्रह, दोन कादंबऱ्या, दोन ललित गद्याची पुस्तके, तीन कथासंग्रह, तीन समीक्षापर लेखसंग्रह, बालकथासंग्रह व संपादित पुस्तक अशी पंधरा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'हकीकत व जटायू', 'उत्खनन', 'पोखरण' व 'पत्रावळ' या चार ग्रंथांना महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कार लाभला. 'अस्मितादर्श' लेखक-वाचक मेळाव्याचे (१९७८) अध्यक्ष होते.

जन्म : २४ नोव्हेंबर १९३७

## यशवंत मनोहर

नागपूर विद्यापीठातील मराठी विभागत मराठीचे प्राध्यापक म्हणून काम करतात. स्वत: डॉक्टरेट प्राप्त केल्यामुळे पी.एच.डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. 'उत्थानगुंफा', 'मूर्तिभंजन' आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील दीर्घ काव्य' ही त्यांची कवितांची पुस्तके. 'दलित साहित्य : सिध्दांत आणि स्वरूप' हे दलित साहित्याच्या कलामूल्यांचा व त्यातील सौंदर्यस्रोताचा विचार करणारे पुस्तक, 'स्वाद आणि चिकित्सा' हा समीक्षा लेखांचा संग्रह ही त्यांची प्रसिध्द झालेली पुस्तके आहेत.शाहिरी वाङ्मय आणि मराठीतील लोकसाहित्य हा ग्रंथ व स्मरणिका प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

## नामदेव ढसाळ

यांचे पूर्ण नांव नामदेव लक्ष्मण ढसाळ. एस.सी.सी. पर्यंत त्यांचे शिक्षण झाले असून 'दलित पँथर' ह्या संघटनेचे दिर्घ काळपर्यंत सक्रीय कार्य मोठ्या जोमाने केले. वैचारिक

*मतभेदामुळे व अंतःस्थ कलहामुळे विभाजित झालेल्या पँथर गटाचे सध्या नेते आहेत. नाकारलेल्या समाजाला परिपूर्ण न्याय मिळावा म्हणून विविध लढे संघटित करीत असतात. 'गोलपिठा', 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले', 'प्रियदर्शनी-आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र', 'तुही इयत्ता कंची', 'खेळ व गांडू बगीचा' हे कवितासंग्रह, 'गोलपिठा' व 'तुही इयत्ता कंची' यांना राज्य पुरस्कार लाभला. त्याचप्रमाणे सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कारही त्यांनी मिळविला. 'हाडकी हाडवळा' ही कादंबरी प्रसिध्द आहे.*

*जन्म : १५ फेब्रूवारी १९४९*

## हिरा बनसोडे

*पूर्ण नांव हिरा गुलाबराव बनसोडे. घरात माहेरी किंवा सासरी फारसे कुणी शिकलेले नसल्याने शैक्षणिक किंवा वाङ्मयीन वारसा मिळण्याची शक्यताच नव्हती.'पौर्णिमा' हा पहिला कवितासंग्रह. पण त्यांचे वैशिष्ट्य जाणवते ते 'फिर्याद' या दुसऱ्या कविता संग्रहातून. दलित स्त्रीवर होणारा अन्याय, तिची परवड, तिचा सोशिकपणा व संयम या सर्व भावनांचे तरल व प्रत्ययकारी आविष्करण त्यांच्या कवितांतून घडते. विविध संस्थांकडून त्यांच्या काही कवितांना पारितोषिके मिळाली आहेत.*

*जन्म : १ ऑक्टोबर १९३९*

## वामन निंबाळकर

*यांचे पूर्ण नांव वामन सुदाम निंबाळकर. ऐन उमेदीच्या वयापासूनच विविध सामाजिक चळवळीत सक्रीय सहभाग घेऊ लागले. 'भीमसंदेश' साप्ताहिकाचे व त्यानंतर 'सा.प्रबोधन'चे संपादन. साहित्य कला विकास मंडळ, 'मिलिंद साहित्य परिषद' या संस्थांते संस्थापक सदस्य. 'अस्मितादर्श' चे काही काळ एक संपादक. 'डॉ बाबासाहेब आंबेडकर अध्ययन मंडळ' नांवाच्या संस्थेची स्थापना. अनेक कविसंमेलनात सहभागी. पँथरचे सक्रीय कार्यकर्ते व त्यासाठी तुरुंगवासही भोगला. 'गावकुसाबाहेरील कविता', 'अस्मितादर्शची नऊ वर्षे', 'बौध्दांच्या सवलती आणि पंतप्रधानांचे वक्तव्य' व 'दलित साहित्य : स्वरूप आणि भूमिका' ही पुस्तके प्रकाशित.*

*जन्म : १९३९*

## अर्जून डांगळे

*यांचे पूर्ण नांव अर्जुन ठमाजी डांगळे. मुंबई विद्यापीठाची मराठी विषयातील एम्.ए. ची पदवी मिळविली. महाराष्ट्रात चैतन्य निर्माण करणाऱ्या 'दलित पँथर' या संघटनेचे एक संस्थापक. कविता, कथा आणि वैचारिक लेखन, कॉलेज जीवनापासूनच राजकीय व सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग. 'छावणी हलते आहे' हा कविता-संग्रह, 'ही बांधावरली माणसं' आणि 'दलित साहित्य : एक अभ्यास' हे संपादन अशी ही तीन प्रकाशित पुस्तके. 'दलित साहित्य संसद' या संस्थेचे कार्यवाह. समाजजीवनात मूलगामी बदल घडून मानवी प्रतिष्ठा पुर्नप्रस्थापित व्हावी म्हणून जे जे प्रयत्न केले जातात त्यात अर्जुन डांगळे या ना त्या प्रकारे सहभागी असतात.*

*जन्म : १५ जून १९४५*

## प्रल्हाद चेंदवणकर

*यांचे संपूर्ण नांव प्रल्हाद नामदेव सोंडे सुलतान असे आहे. आपल्या एका जिवलग मित्राच्यासाठी त्यांनी चेंदवणकर असा बदल करून घेतला.मुंबई विद्यापीठातून १९६८ मध्ये बी.कॉम. ची पदवी प्राप्त केली. कथा, कविता आणि समीक्षात्मक लेखन प्रसिध्द, 'ऑडिट' हा कवितासंग्रह १९७५-७६ चे उत्कृष्ट पुस्तक म्हणून पुण्याच्या मराठी साहित्य परिषदेकडून स.ह. गोखले पारितोषिक मिळाले. 'ऑर्डर ऑर्डर' हा दुसरा कवितासंग्रह प्रसिध्द झाला आहे. आत्मचरित्र लेखनाचा संकल्प चालू आहे.*

*जन्म १५ जुलै १९३७.*

## माधव कोंडविलकर

*पूर्ण नांव महादेव गुणाजी कोंडविलकर. शालेय शिक्षण खऱ्या अर्थाने सातवीपर्यंत. काही दिवस मुंबईच्या रात्रशाळेत. पुढे एस्.एस्.सी. परीक्षा पास.'इटूकले राव' हा बालगीतांचा संग्रह, 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या आत्मपर लेखनाला राज्य सरकारचा पुरस्कार व फ्रेंच भाषेत अनुवाद. अजून उजाडायचंय, अनाथ इत्यादी कादंबऱ्या व कथासंग्रह प्रसिध्द आहेत.*

*जन्म : १५ जुलै १९४१*

## ज्योती लांजेवार

*यांचे पूर्ण नांव ज्योती बाबूराव लांजेवार, शालेय आणि पदवी व पदवीनंतरचे शिक्षण नागपूरमध्ये पूर्ण केले. आई लढाऊ वृत्तीची असल्यामुळे विषमता आणि सामाजिक अन्यायाची चीड यांचे बाळकडू त्यांना बालपणापासूनच लाभले.'दिशा' हा पहिला कवितासंग्रह, 'झेप' हा दुसरा संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर. समाजिकता हा त्यांच्या कवितेचा प्राण आहे. मानवतेच्या आणि समानतेच्या प्रतिष्ठापनेसाठी क्रांतिकारक नवविचारांची पेरणी करणारी त्यांची कविता संसूचन करणारी आहे. सध्या पी.एच.डी. चा अभ्यास करीत असून नागपूरच्या श्री. बिंझाणी नगर महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापिका आहेत. वैचारिक व वाङमयीन लेखांचा संग्रहदेखील प्रकाशनाच्या वाटेवर आहे.*

*जन्म : २५ नोव्हेंबर १९५०*

## ज. वि. पवार

*जयराम विठ्ठल पवार. सिध्दार्थ महाविद्यालय मुंबई येथून मराठी व तत्वज्ञान या विषयांत बी. ए. (ऑ.) ची पदवी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या दलित मुक्तीलढ्याच्या चळवळीत प्रामुख्याने झोकून देणारांपैकी एक महत्वाचे खंदे कार्यकर्ते. 'बलिदान' ही चळवळीचे श्रेष्ठत्व सांगणारी कादंबरी आणि 'नाकेबंदी' हा कवितासंग्रह प्रकाशित. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील निवडक कविता 'उच्छवास युगंधराचे' ह्या नांवाने संपादित केल्या आहेत.*

*जन्म : १५ जुलै १९४४*

## मल्लिका अमरशेख

*शालेय आयुष्यापासून कला, नृत्य व अभिनयाची चांगली समज यांना आहे. कविता, नाटक, कथा, नृत्य, संगीत आणि अभिनय ही अंगे. शालेय जीवनात नाशिकच्या कलायतन ह्या संस्थेने १९७१-७२ 'सर्वोत्कृष्ट बाल कवयित्री' म्हणून प्रथम पुरस्कार दिला होता. 'वाळूचा प्रियकर' हा कवितासंग्रह प्रसिध्द झाला आहे. 'मला उदध्वस्त व्हायचंय' या आत्मपर ग्रंथाने खूप खळबळ उडविली. स्वतःच्या प्रतिक्रिया तिखटपणे व कोणाचाही मुलाहिजा न ठेवता अभिव्यक्त केल्या आहेत. दोन कादंबऱ्या प्रसिध्दीच्या मार्गावर. सध्या 'नंतर' या मासिकाच्या निर्मितीत आणि संपादनात व्यग्र.*

*जन्म : १६/२/१९५६*

## प्रकाश जाधव

*ऐन तारुण्यातच आयुष्यातील सर्व विदारक अनुभव वाट्याला येणारा हा कवी, जेमतेम मॅट्रिकपर्यंतच शिकू शकला. शिक्षण एवढेच. समज आल्यापासून कुटुंबातल्या दारिद्रयाने आणि आर्थिक ओढगस्तीने पाठपुरावा केला. वर्तमानपत्रे टाकली, कॅन्टिनमधे काम केले. प्रेसमधे पडतील ते कष्ट उपसले. अनेक कारखान्यात, राहू देतील तोपर्यंत तऱ्हे-तऱ्हेची कामे केली. विद्रोही कवितेच्या दुसऱ्या दशकातील अग्रक्रमाचे नाव म्हणून, जाधव यांचा उल्लेख करावा लागेल. 'दस्तऐवज' हा त्यांचा कवितासंग्रह.*

*जन्म : ३ नोव्हेंबर १९५१ .*

## त्र्यंबक सपकाळे

*यांचे संपूर्ण नांव त्र्यंबक सांडू सपकाळे. प्रत्यक्ष शिक्षण जरी मॅट्रीकपर्यंत झालेले असले तरी आयुष्याकडून त्यांना खूप शिकायला मिळाले. सवर्णांच्या व गावकऱ्यांच्या जाचामुळे बालवयातच बहिष्काराचा धडा मिळाला. जगण्यासाठी वडीलांना गाव सोडावे लागले. गाडीभाड्याला पैसे नसल्यामुळे खूप पायपीट करावी लागली. दुखणारे पाय. दोरी बांधून वेदना शमवल्या. 'सुरूंग' हा कवितासंग्रह प्रसिध्द.*

*जन्म : २२ एप्रिल १९३०*

## बा. स. हाटे

*यांचे पूर्ण नांव बाळ सज्जन हाटे. रायगड जिल्ह्यातील दासगाव या गावी त्यांचा जन्म झाला. बालपणापासून अवतीभवती घडणाऱ्या चळवळीचे प्रभावी तरंग त्यांच्या मनाला अस्वस्थ करू लागले होते. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे जी चवदार तळ्याच्या संघर्षाची चळवळ केली तिने सगळा परिसरच भारून टाकला होता. त्यावरच 'जिथं पाणी पेटलं' ही संदर्भपुस्तिका हाटे यांनी लिहिली. कविता लेखनही विपूल केले आहे. 'रक्तखुणा' हा प्रसिध्द झालेला कवितासंग्रह. डॉ. आंबेडकरांच्या चळवळींना कादंबरीरूपाने शब्दबध्द करण्याचा संकल्प त्यांनी सोडला असून त्यापैकी 'युगविधान' ही कादंबरी प्रसिध्द झालेली आहे. 'युगंधर' आणि 'युगान्त' या कादंबऱ्या प्रसिध्दीच्या मार्गावर आहेत.*

*जन्म : ११ डिसेंबर १९३६*

## भगवान भोईर


*यांचे पूर्ण नांव भगवान रामा भोईर. ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यातल्या कोने नावाच्या खेडेगावात त्यांचा जन्म झाला. मुंबई विद्यापीठात एम्.ए. ची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून १९७१ ते १९७७ पर्यं नोकरी केली आणि १९७८ पासून भिवंडी महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक. कवितेबरोबर ललित गद्य, कथा, व वैचारिक लेखन सातत्याने करीत असतात. ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या दुःखाचे व आशाआकांक्षाचे पृथगात्म दर्शन त्यांच्या कवितेत घडते. 'उन्हातलं गांव' हा कवितासंग्रह प्रकाशित.*

*जन्म : १ जून १९५०*

## भुजंग मेश्राम

*तरूण दलित आदिवासी कवी. १९७६ पासून काव्य लेखनास आरंभ. यांची सर्व कविता विविध पातळ्यांवर अवतरते. मुख्यतः दलित व आदिवासी जीवनातील ताणतणाव, संघर्ष यांचे चित्रण करते. 'उलगुलान' हा त्यांचा १९९० साली प्रकाशित झालेला पहिलाच काव्यसंग्रह. 'उलगुलान' म्हणजे एकाचवेळी सर्व क्षेत्रात उठाव करणे, असा त्याचा अर्थ आहे.*

124277
31.3.08




Library IIAS, Shimla
MR 891.461 8 Su 79 D
00124277